



संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, शुक्रवार दि. ०५.१२.२०२५ | अंक नं. २०४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020







# नगरमध्ये धावत्या बसला अचानक आग; जळून झाला कोळसा

नगर – नगर शहराबाहेरील अरणगाव ते वाळुंज बायपास रस्त्यावर बाबुर्डी घुमट फाटा येथे ५ डिसेंबर रोजी पहाटे ३ च्या सुमारास 'द बर्निंग बस'चा थरार पहावयास मिळाला. रस्त्याने धावत असलेल्या खाजगी बसला अचानक आग लागली. काही वेळातच आग मोठ्या प्रमाणावर भडकली. मात्र त्या परिसरात रात्री वाहनांची तपासणी करणाऱ्या आरटीओ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान दाखवत बसमधील ३५ प्रवाशांना सुखरूप बाहेर काढल्याने त्यांचे प्राण वाचले. या दुर्घटनेत बस पूर्ण जळून खाक झाली आहे.

आरटीओ कार्यालयातील सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक हर्षल रामभाऊ जगताप व त्यांचे सहकारी हे बायपास रोडवर रात्रीच्यावेळी वाहन तपासणीसाठी थांबलेले होते. पहाटे ३ च्या सुमारास विरुद्ध दिशेने येणाऱ्या एका खाजगी बसला आग लागल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. सदर कन्हैया ट्रॅव्हल्स बस (क्र.एमएच ०९, सीव्ही ६३०९) ही पुण्याहून बीडकडे एकूण ३५ प्रवासी घेऊन जात होती. हर्षल जगताप यांनी बस चालकाला थांबण्याचा इशारा करत त्वरित गाडी थांबवायला सांगितली आणि जगताप व त्यांचेसोबत असलेले चालक सोमीनाथ शिंदे हे धावत बसकडे गेले.

आग नुकतीच लागलेली होती व ती तीव्रतेने वाढत होती, आतून लोकांचा आवाज येत होता, काही लोक बाहेर पडत होती आणि काही आतच होती, त्यातले काही झोपेतच होते, आगीचा अंदाज घेऊन जगताप व चालक सोमीनाथ शिंदे यांनी बसच्या आतमध्ये जाण्याचे धाडस केले व उरलेले प्रवासी बाहेर काढले. त्यांच्यामध्ये महिला आणि लहान मुलांचा देखील समावेश होता. दोघांनीही प्रसंगावधान दाखवल्यामुळे कुठलीही जीवितहानी झाली नाही आणि त्यांना बाहेर काढण्याचे प्रयत्न सफल झाले. याच दरम्यान अग्निशमन दलासदेखील कॉल करून बोलावले. महापालिकेच्या अग्निशामक दलाचे वाहनचालक शुभम गावडे, चिंधू भांगरे, फायरमन युवराज रासकर, ऋषिकेश घोंगडे, करण राठोड यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पेटलेल्या बसवर पाण्याचा फवारा मारून आग आटोक्यात आणण्यात आली. मात्र तोपर्यंत बस पूर्ण जळाली होती.

काही वेळाने आरटीओ कार्यालयातील दुसऱ्या पथकातील वरिष्ठ मोटार वाहन निरीक्षक सुनील पाटील व सहकारी सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक विलास धूम घटनास्थळी आले व त्यांनी आणि जगताप यांनी सर्व प्रवासी यांची बीडला जाण्याची व्यवस्था इतर बसमधून करून दिली. वाहन निरीक्षक हर्षल जगताप यांनी दाखवलेले प्रसंगावधान व पेटलेल्या बसमध्ये जाण्याचे केलेले धाडस यामुळे ३५ प्रवाशांचे प्राण वाचले.

## आरटीओ अधिकाऱ्यांच्या प्रसंगावधानाने वाचले ३५ प्रवाशांचे प्राण





नगरच्या बायपास रोडवर पेटलेल्या बसमधून निघणाऱ्या आगीच्या ज्वाला. तर दुसऱ्या छायाचित्रात आग विझवताना महापालिकेच्या अग्निशामक दलाचे पथक.





**'टीईटी' विरोधात नगरमध्ये शिक्षकांचा मोर्चा** टीईटी परीक्षा विरोधात महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक व माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर संघटना समन्वय समितीच्या वतीने ५ डिसेंबर रोजी शाळा बंद आंदोलन करत नगर मध्ये पारिजात चौक, गुलमोहर रोड येथून जिल्हाधिकारी कार्यालयावर पायी मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाच्या ठिकाणी आ.सत्यजित तांबे यांनी आंदोलनास पाठींबा दर्शविला.

# 'आरबीआय'कडून रेपो दरात ०.२५ टक्के कपात

नवी दिल्ली – आरबीआयने रेपो दर ०.२५ टक्के ने कमी करून ५.२५ टक्के केला आहे. हा कपातीचा निर्णय मॉनिटरी पॉलिसी कमिटीच्या ३ ते ५ डिसेंबर दरम्यान झालेल्या बैठकीत घेण्यात आला. गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी ५ डिसेंबर रोजी ही माहिती दिली.

आरबीआय ज्या दराने बँकांना कर्ज देते, त्याला रेपो दर म्हणतात. जेव्हा आरबीआय रेपो दर कमी करते, तेव्हा बँकांना स्वस्त कर्ज मिळते आणि ते हा फायदा ग्राहकांपर्यंत पोहोचवतात. म्हणजेच, आगामी काळात गृह आणि वाहन यांसारखी कर्जे ०.२५ टक्के पर्यंत स्वस्त होतील.















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# निवडणूक आयोग की अडवणूक प्रयोग? सावळा गोंधळ नव्हे तर काळाकुट्ट गोंधळ

## ... तर मतदारांनी याच्या निषेधार्थ संपूर्ण मतदानावरच एकजुटीने बहिष्कार घालावा; सुहासभाई मुळे यांचे आवाहन




मा. महोदय,

दिवसेंदिवस जग इतकं प्रगती करत आहे की, ही पृथ्वी सोडून वस्ती करण्यासाठी मंगळाचे आणि चंद्राचे स्वप्न बघितले जात आहेत. आणि आपण फक्त आपल्या परिक्षेत्रातल्या माणसांचं अचुक रेकॉर्ड ठेवू शकत नाही. तंत्रज्ञानाने तर इतकी प्रगती केली आहे की माणसानं स्वतः करावं असं काही ठेवलेलंच नाही. अशाही अवस्थेमध्ये इसवी सन १९५२ मध्ये भारतामध्ये पहिल्या निवडणुका झाल्या त्यावेळेस अगदी नवीन नवीन पहिल्याच प्रारूप मतदार याद्या तयार केल्या गेल्या, त्या निवडणुकांमध्ये सुद्धा कुठलाही गोंधळ उडाला नाही, (कदाचित गोंधळ कसा घालायचा हे त्यावेळच्या लोकांना समजत नसेल).

इतका गोंधळ स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ७८ वर्षांनी निवडणूक आयोग नावाचा जो महाकाय पांढरा हत्ती आहे, तो पांढरा हत्ती आज गोंधळ घालत आहे. आणि निवडणूक आयोग ही एक स्वायत्त संस्था आहे. असं एक घासून घासून गुळगुळीत झालेलं अर्धसत्य वाक्य तोंडावर फेकणारे कितीही ओरडले, तरी त्या हत्तीचा माहूत अर्थातच सरकार आहे.

निवडणुकांवर होणारा खर्च मागील निवडणुकीच्या आकडेवारीनुसार सुमारे एक लाख ३५ हजार कोटी रुपये इतका आहे. आणि संपूर्ण भारताचं वार्षिक बजेट हे ४९ हजार लाख कोटी रुपये आहे. फक्त निवडणूक प्रक्रियेवर इतका प्रचंड पैसा जर खर्च होत असेल, तर त्यामध्ये या प्रचंड तंत्रज्ञान असलेल्या संगणकीय युगात अचूकता असायलाच हवी. परंतु अगदी २४ तासावर निवडणूक येऊन ठेपल्यानंतर जेव्हा ती दोषांमुळे रद्द केली जाते, यासारखे लाजिरवाणी गोष्ट नाही.

आपल्या एकट्या अहिल्यानगर शहरांमध्ये मतदार प्रारूप याद्यांवर ९००० हरकती दाखल झाल्या आहेत. त्यामधील बऱ्याचश्या हरकती फक्त समोरच्या उमेदवाराला त्रास देण्यासाठी दाखल झाल्या असल्या तरी, सगळ्याच बिनबुडाच्या आणि खोट्या आहेत असे म्हणता येणार नाही, इतक्या चुका निवडणूक आयोगाकडून होत असतील तर हा आयोगच बरखास्त करण्यात यावा. अशी सामान्य मतदाराची भावना आहे.

शिक्षकांना आणि काही सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांचे स्वतः चे स्वतःचे काम सोडून प्रत्येक वेळी नवीन मतदार सर्वेक्षण करणे, आणि तत्सम संबंधित कामांसाठी सर्रास जुंपणारे हे सरकार आणि निवडणूक आयोग त्यामध्ये हजारो कर्मचारी हजारो सुटाबुटातले लाखो रुपये पगार घेणारे अधिकारी, हे स्वतः ५ वर्षे रोज मानेवर खडा ठेवून ८ तास नेमकं काय काम करत असतात? हा नेहमी प्रश्न पडतो. दुबार मतदार नोंदणी, मेलेल्या माणसांची नोंदणी, परप्रांतातल्या लोकांची दोन दोन ठिकाणी नोंदणी, एवढेच नव्हे तर दुसऱ्याच्या नावावर बोगस मतदान करणारी बिनधास्त माणसं, हे सर्व काही केवळ निवडणूक आयोगाच्या अजागळ कारभारामुळेच शक्य होतं. आपल्या घटनेमध्ये यासाठी कुठलीही कठोर शिक्षेची तरतूद केलेली नाही, हे एक आश्चर्य आहे. या अशा प्रकारासाठी देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची तरतूद जर केली तर मला वाटतं हे प्रकार थांबतील.

आधार कार्ड सारख्या वैयक्तिक गोष्टी एकूण एक गोष्टीला लिंक केलेल्या असताना असे घडू शकते, हा त्या तंत्रज्ञानाचा आणि आयोगाच्या कार्यक्षमतेचा पराभव आहे. एक टी एन शेषन यांचा अपवाद वगळला तर हा आजचा निवडणूक आयोग नाही तर हा निवडणूक प्रयोग आहे, असे वाटू लागते, इतका भांबावलेला आणि अजागळ कारभार असलेला आयोग असू शकतो काय? याच आयोगासारखे कितीतरी अनेक खाते. पांढरे हत्ती म्हणून स्वातंत्र्य मिळाल्यापासून देशात पोसले गेले आहेत. उदाहरणच द्यायचं तर प्रदूषण नियंत्रण खाते, हवामान खाते, वन खाते, पुरातत्त्व खाते, भेसळ प्रतिबंधक खाते, वजन मापे तपासणी खाते, या खात्यांमध्ये लाखो रुपये पगार घेणारे हजारो अधिकारी नेमकं काय करत असतात? हा नेहमी पडणारा प्रश्न आहे. या सर्व खात्यांमध्ये एकदा सरप्राईज व्हिजिट मारून पहा. सगळे जण टंगळमंगळ करत मोबाईलशी खेळताना दिसतील. आणि साहेब कुठे गेले असा प्रश्न विचारला तर मिटींगला गेले... असं उत्तर मिळेल.. कुठे गेले कोणाबरोबर मिटींगला गेले, कोणालाही सांगता येणार नाही. या सगळ्यां पांढरे हत्ती असलेल्या खात्यांचे आणि आयोगांचे विलीनीकरण करून. नाही तरी ही सगळी कामं पार्ट टाईमच कामे असल्यामुळे एकच महाआयोग स्थापन करायला काय हरकत आहे? आणि त्या महाआयोगावर बिग्रेडियर मेजर जनरल दर्जाचा दुर्मिळ मिलिटरी चा अधिकारी नेमला तर हजारो कोटी रुपये यांच्या वेतनावर खर्च होणारे वाचतील.

आता प्रत्येक मतदाराला हा प्रश्न पडायला हरकत नाही की, आपण मतदार यादी मध्ये मेलेलो आहोत की जिवंत आहोत? याच प्रांतात राहतो आहोत? की दुसऱ्या प्रांतात राहत आहोत? आपण मतदान केंद्रावर जाण्याच्या आधी आपल्या नावाने मतदान झाले की काय? आणि मुख्य म्हणजे आपल्याला उमेदवाराकडून घरपोच मिळणारे आपले मतदानाचे पैसे बुडले की काय? आपल्या लोकशाहीची ही शोकांतिका आहे. यासाठी एकच उपाय कुठल्याही निवडणुकीपूर्वी निवडणूक आयोगाचे काम अचुक पूर्ण झालं आहे की नाही ? त्यावर कुणाची काही हरकत आहे का? यासाठी अगोदरच एक पंचवार्षिक योजना सत्ताधारी पक्षाने राबवावी., नाहीतर या मुर्दाड होत चाललेल्या लोकशाहीमध्ये एकच पर्याय.. जे कोणी बुद्धीने आणि मनाने जिवंत आहेत, त्या मतदारांनी या सावळ्या गोंधळाच्या निषेधार्थ संपूर्ण मतदानावरच एकजुटीने बहिष्कार घालावा.

नाहीतरी निवडणुकी अभावी गेल्या पाच वर्षापासून संपूर्ण देश प्रशासक राज वरच चाललेला आहे, अशा आशयाचे पत्र जनहित परिषद व जागरूक नागरिक मंचचे अध्यक्ष सुहासभाई मुळे यांनी मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य., मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य., जिल्हाधिकारी अहिल्यानगर., आयुक्त अहिल्यानगर यांना पाठविले आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी
डॉ.रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

“मुसाफिर”
वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन: दिशान फिचर्स

### हरवलेली रसिकता

आपली कल्पकता, विचार आणि कौशल्य यांचा उपयोग करून माणूस निसर्गातील सौंदर्याला आपल्यात आणून आपल्या कलाकृती घडवीत असतो. माणूस हा सौंदर्याचा आस्वादही घेऊ शकतो आणि कलेच्या आविष्कारातून सौंदर्याची निर्मितीही करू शकतो. त्यातून काव्य, नाटक, संगीत, चित्र जन्म घेते. निसर्गनिर्मित आणि मानवनिर्मित कलांचा निर्भेळ आस्वाद घेण्याची वृत्ती म्हणजे रसिकता होय. सौंदर्य हे निर्मितीने जेवढे फुलते त्यापेक्षाही रसिकतेच्या आस्वादाने अधिक खुलते.

रसिकत्व ही परमेश्वराने मानवाला दिलेली एक मोठी देणगीच आहे. थोडे वर्तमान स्थितीकडे पाहिल्यास लक्षात येईल की आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत आणि सारखे धावत सुटलेल्या स्पर्धेच्या युगात आपण ही रसिकता हरवून बसलो आहोत.

ज्ञानदेवांनी एक सुंदर दृष्टान्त दिला आहे.
वाद्येवीण नादु। नेदी कवणाही सादु ।
का अपुष्पी मकरंदु । न लभे जैसा ।।

फुलांचा सुगंध दरवळायला लागला की आपोआप भ्रमर जमा होऊ लागतात. वाद्ये लावली आहेत, गाण्याची सुंदर मैफल रंगत आहे, गाण्याचे स्वर दूरवर पसरले आहेत, स्वरांचा अभिषेक होतो आहे, गाण्यातला प्रत्येक शब्द स्वरांनी नटला आहे पण त्याचा आनंद घेण्यासाठी रसिकतेचा मात्र अभाव आहे. अशा सुरेल संगीताच्या मैफिलीला रसिकांची म्हणावी तशी उपस्थिती लाभली नाही तर ? फुलांच्या सुगंधासाठी भ्रमराला आवातणं द्यावे लागत नाही. इथे बऱ्याच वेळा मैफिलीसाठी माणसे जमवावी लागतात. कित्येक वेळा व्याख्यानमालेत श्रोत्यांअभावी वक्त्याला थांबावे लागते. उत्तम वक्ता असला तरी श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद असल्याशिवाय भाषण रंगणार नाही. मग चांगल्या वक्त्याला आणावे की नाही या विवंचनेत सापडणारे संयोजक आपणास नेहमी पाहायला मिळतात. रसिकतेने ऐकणारा श्रोता लाभणार नसेल तर वक्त्याचा विचारसंवाद इथेच थांबेल.

रंगभूमीवरील उत्तम उत्तम नाटकेही रसिकांच्या अभावी कमी कमी होत आहेत. 'माझ्या कानावर चहूबाजूंनी चांगले विचार पडोत' असे म्हणणारी श्रवणसंस्कृती हळूहळू लोप पावत चालली आहे. 'वेळ नाही काय करावे ?' हे कारण त्यासाठी पुढे केले जात आहे. जीवन जगताना ज्यातून आनंद मिळवायचा ती आनंदाची शिदोरीच आपणापासून दुरावत चालली आहे. तर दुसरीकडे प्रदूषण, ताण-तणाव, समस्या, कलह, जीवघेण्या स्पर्धा यांच्यामागे धावता धावता जगणेही क्लेशदायी होऊन बसले आहे. कोणत्याही प्राप्त स्थितीत जीवनाचा आनंद घेण्यासाठी काही वेळ बाजूला ठेवायलाच हवा. रसिकतेची अनुभूती हाच आनंद आहे. हरवलेली रसिकता हेच दुःख होय. काकासाहेब कालेलकरांनी म्हटले होते, जगातील खरे दुःख हे निर्धनता नसून निरसता आहे.

- किशोर गांधी, मो. ९८२२०२०६९१

## सावेडी उपनगरातून मोटारसायकलची चोरी

नगर - सावेडी उपनगरातील रेणावीकर कॉलनी येथे घरासमोर लावलेली केटीएम ड्युक २५० मोटारसायकल (क्र.एम एच १६ डीटी ७४३३) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २ डिसेंबर रोजी रात्री ११ ते ३ डिसेंबर रोजी सकाळी ८ या कालावधीत घडली.

याबाबत सौरभ विवेक अमृत (रा. रेणावीकर कॉलनी, सावेडी) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध बीएनएस कलम ३०५ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## सर्जेपुरा येथे एकाची गळफास घेत आत्महत्या

नगर - राहत्या घरात छताला गळफास घेऊन तरुणाने आत्महत्या केल्याची घटना शहरातील सर्जेपुरा येथील रंगभवन परिसरात ४ डिसेंबर रोजी दुपारी उघडकीस आली. अक्षय अशोक उमाप (वय ३२, रा. रंगभवन, सर्जेपुरा) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.


अक्षय उमाप (मयत)

अक्षय उमाप यांनी घरात गळफास घेतल्याचे निदर्शनास येताच त्यांना त्यांचे नातेवाईक यांनी उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथील डॉक्टरांनी त्यास तपासून ते औषध उपचारापूर्वीच मयत झाले असल्याचे घोषित केले. याप्रकरणी जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.अभय सानप यांनी दिलेल्या अहवालावरून तोफखाना पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, आजी, मामा, मामी, १ बहिण, मेव्हणे असा परिवार आहे.

## विश्वनाथ पाचपुते यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - काष्टी येथील रहिवासी विश्वनाथ दादा पाचपुते (वय ९१) यांचे ५ डिसेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर काष्टी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, ३ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कैलास व बबन पाचपुते यांचे ते वडील होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.


भारतातील प्रसिद्ध सारंगखेडा अश्व बाजार चेतक फेस्टिव्हलच्या उद्घाटन सोहळ्यात अहिल्यानगर येथील गुलशन स्टड फार्मचा सर्व गुणसंपन्न आणि देखणा अश्व मुसा हा घोडा प्रमुख आकर्षण ठरला. उद्घाटन प्रसंगी पणन व राजशिष्टाचार मंत्री तसेच धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी या घोड्याची पाहणी केली.

## भारतातील सारंगखेडा अश्व बाजार चेतक फेस्टिव्हलमध्ये अहिल्यानगरचा 'मुसा' घोडा ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू

नगर - भारतातील प्रसिद्ध सारंगखेडा अश्व बाजार चेतक फेस्टिव्हलच्या उद्घाटन सोहळ्यात अहिल्यानगर येथील गुलशन स्टड फार्मचा सर्व गुणसंपन्न आणि देखणा अश्व मुसा हा घोडा प्रमुख आकर्षण ठरला. उद्घाटन प्रसंगी पणन व राजशिष्टाचार मंत्री तसेच धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी या घोड्याची पाहणी केली. तसेच चेतक फेस्टिव्हलचे आयोजक मुन्नादादा रावल यांनीही 'मुसा'ची जवळून पाहणी करून घोड्याच्या देखणेपणाबद्दल आणि त्याच्या गुणवैशिष्ट्यांबद्दल गुलशन उद्योग समूहाचे उद्योजक इम्रान शेख यांच्याशी चर्चा केली. या प्रसंगी मनोज राजे भालसिंग, बाबा आत्तार, रमेश मगर आदी उपस्थित होते.

'मुसा' घोड्याच्या आकर्षक बांध्यावर, शिस्तबद्ध प्रशिक्षणावर आणि दमदार उपस्थितीवर सर्वांनी कौतुकाची थाप दिली. चेतक फेस्टिव्हलमध्ये 'मुसा'ची उपस्थिती ही यंदाच्या सोहळ्याची शोभा ठरल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## 'आकडा' टाकून वीजचोरी करणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल

नगर - महावितरणच्या सर्व्हिस वायरला कट करून आकडा टाकून वीज चोरी करणाऱ्या दोघांवर महावितरणच्या भरारी पथकाने कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे. नगर-जामखेड रोडवर वैद्य कॉलनी आणि दरेवाडी शिवारातील तुक्कडओढा येथे ही कारवाई करण्यात आली आहे.

याबाबत महावितरणचे भरारी पथकातील अभियंता विजयकुमार पंडितराव गुर्जर यांनी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, वीज चोरीचे प्रमाणात वाढ झाल्यामुळे वीज ग्राहकांच्या मीटर व वीज पुरवठ्याची तपासणी करून वीज चोरी शोधून त्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. यामध्ये भरारी पथकासह तपासणीकरिता जामखेड रोडवर वैद्य कॉलनी येथे सुभाष बापूराव सूर्यवंशी यांच्या घरी तपासणी केली असता त्यांनी मीटरच्या सर्व्हिस वायरला कट करून आकडा टाकून वीज चोरी करताना आढळून आले. तर दरेवाडी शिवारातील तुक्कडओढा येथे बबन गेनू बेरड हा विजेच्या खांबावर आकडा टाकून वीज चोरी करत त्याचा वापर घरात करत असल्याचे आढळून आले. त्यामुळे त्यांनी आकडा टाकण्यासाठी वापरलेली केबल जप्त करत त्या दोघांना वीज चोरीचे बिल आणि तडजोडीची रक्कम याचे बिल देण्यात आले होते. मात्र या दोघांनीही या मुदतीत बिल भरले नसल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या फिर्यादीवरून दोघांच्या विरुद्ध भारतीय विद्युत कायदा २००३ चे कलम १३५ प्रमाणे २ वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## महापालिकेने अन्यायकारक मालमत्ता करवाढ रद्द करावी अन्यथा १९ डिसेंबरला आयुक्तांची गाडी अडवून 'आंदोलन'

### 'ड' वर्ग महापालिकेने 'अ' वर्ग महानगरपालिकेच्या दराने कर आकारणी करणे ही नियमबाह्य

नगर - अहिल्यानगर महानगरपालिका प्रशासनाने नागरिकांना पाठवलेल्या सुधारित मालमत्ता कर नोटिसांमधील गंभीर त्रुटी, अन्यायकारक करवाढ आणि नियमांचे खुले उल्लंघन याविरोधात नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. या वाढीव कर नोटिसा तात्काळ रद्द न केल्यास १९ डिसेंबर रोजी आयुक्तांची गाडी अडवून आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इसहाक यांनी दिला आहे.

नागरिकांकडून महापालिकेला मोठ्या प्रमाणावर तक्रारी प्राप्त होत असून सुधारित कर आकारणी करताना कोणत्याही प्रकारची प्रत्यक्ष पाहणी, तांत्रिक तपासणी, मोजमाप किंवा बांधकामातील बदलांची पडताळणी न करता सरसकट कर वाढ लावण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. महापालिकेने पंचनामा, नकाशे किंवा आवश्यक पुरावे न घेता घेतलेले एकतर्फी निर्णय हे पूर्णपणे नियमबाह्य असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

मोजणीसाठी येणारे कंत्राटी कामगार शिक्षण आणि तांत्रिक पात्रतेचे कोणतेही पुरावे दाखवू न शकल्याची धक्कादायक माहिती समोर आली असून पुरावा मागितल्यावर उलट जास्तीची पट्टी लावण्यात येत असल्याचा आरोप शेख मुदस्सर यांनी केला. मुकुंदनगरसह अनेक भागांमध्ये ४५-५० वर्ष जुनी घरांनाही नव्याने बांधकाम परवानगी व कागदपत्रे सादर करण्याची मागणी केली जात आहे.


महापालिकेने अन्यायकारक मालमत्ता करवाढ रद्द करावी अन्यथा १९ डिसेंबरला आयुक्तांची गाडी अडवून 'आंदोलन' करणार असल्याचे निवेदन आयुक्तांना देताना शेख मुदस्सर अहमद इसहाक. समवेत नागरिक

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे मोजमाप, क्षेत्रफळ व वापर प्रकारात मोठ्या प्रमाणात विसंगती असून हॉल, बेडरूम, किचन तसेच विविध मजल्यावरील वापर चुकीच्या कॉलममध्ये नोंदवल्याने करामध्ये अवास्तव वाढ करण्यात आली आहे. २०२४-२५ मधील कर रचनेतील वाढ ही महसूल उद्दिष्ट गाठण्यासाठी करण्यात आलेली मनमानी असून 'ड' वर्ग महापालिकेने 'अ' वर्ग महानगरपालिकेच्या दराने कर आकारणी करणे ही हास्यास्पद व नियमविरोधी बाब असल्याचे शेख मुदस्सर यांनी नमूद केले.

मुकुंदनगर भागात चार दिवसांनी मिळणारा पाणीपुरवठा, जीर्ण रस्ते, कचऱ्याचा प्रश्न आणि मूलभूत सुविधांचा अभाव या पार्श्वभूमीवर कर वाढ करणे हे नागरिकांवरील दुहेरी अन्याय असल्याचे ते म्हणाले. वाढीव कर नोटिसांमुळे अनेक नागरिकांचे बीपी व शुगर वाढून त्यांना रुग्णालयात दाखल होण्याची वेळ आलेली असून नागरिकांच्या आरोग्याला धोक्याची वेळ आल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी महापालिकेची असेल, असेही निवेदनात नमूद आहे.

शेख मुदस्सर अहमद इसहाक यांनी प्रशासनाला चुकीच्या नोटिसा तात्काळ रद्द करून प्रत्यक्ष सर्वेक्षण, पारदर्शक पुनर्परीक्षण आणि तांत्रिक त्रुटींची दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी व नागरिकांना झालेला आर्थिक भार त्वरित दूर करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. निवेदनातील मागण्या तात्काळ मान्य न केल्यास १९ डिसेंबर रोजी महापालिकेसमोर आयुक्तांची गाडी अडवून आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

# स्वयंसेवा

## सामाजिक परिवर्तनाचा निस्वार्थ प्रवास

समाजाची खरी ताकद ही फक्त त्याच्या आर्थिक, भौतिक किंवा तांत्रिक प्रगतीत नसते, तर समाजातील लोकांची एकमेकांसाठी असलेली संवेदनशीलता, नाती, कर्तव्यभावना आणि परस्पर सहयोगी संस्कृती यांत असते. व्यक्तीला व्यक्तीशी जोडणारा आणि समाजाला अधिक मानवी बनवणारा जो सर्वात महत्त्वाचा सेतू आहे, तो म्हणजे 'स्वयंसेवा' होय. आधुनिक जगातील वाढत चाललेला व्यक्तिकेंद्रीवाद, उपभोक्तावाद आणि भौतिक स्पर्धा यांच्या गर्जनेतही स्वयंसेवेचे निस्वार्थ मूल्य अजूनही अढळ आहे आणि हीच स्वयंसेवेची माती जागतिक पातळीवर समाजातील बदलांचे बीज रोवते. स्वयंसेवेचे महत्व अधोरेखित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने ५ डिसेंबर हा दिवस 'आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक दिन' म्हणून घोषित केला. स्वयंसेवकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस आपल्याला या सामाजिक कार्यकर्त्यांच्या योगदानाची जाण करून देतो आणि अधिकाधिक लोकांना समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा देतो.

स्वयंसेवा म्हणजे केवळ एखाद्या संस्थेशी जोडले जाणे किंवा त्यांच्या माध्यमातून काम करणे एवढेच नव्हे; ती एक मानवी प्रवृत्ती आहे. स्वयंसेवा ही नोकरी नसते, त्यासाठी पगार नसतो; पण त्यात समाधान, आत्मिक आनंद आणि समाजकारणाची अनुभूती असते. व्यक्ती जेव्हा निस्वार्थपणे, कोणतेही भौतिक अपेक्षा न ठेवता समाजातील इतरांच्या कल्याणासाठी काम करते, तेव्हा त्या कार्यात निर्माण होणारा मूल्यांचा, अनुभवांचा आणि भावनांचा संयोग समाजबांधणीची मूळ व्याख्या तयार करतो. समाजशास्त्रीय दृष्टीने स्वयंसेवा ही सामाजिक ऐक्य, सहकार्य, समता आणि मानवी हक्कांच्या संरक्षणाला बळ देणारी प्रक्रिया आहे. ती सामाजिक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी नागरी समाजाला सक्रिय करते आणि लोकतांत्रिक मूल्ये दृढ करते.

भारतातील लोकजीवनात स्वयंसेवेची परंपरा अत्यंत प्राचीन आहे. आपल्याकडे दान, सेवा, सहकार्य, परोपकार यांना नेहमीच सर्वोच्च स्थान देण्यात आले आहे. धर्म, अध्यात्म, संतपरंपरा, भिक्षादान, अन्नदान, वृक्षारोपण, जलसंधारण, वाचनालये, लोकशिक्षण, स्वातंत्र्यलढा या सर्व क्षेत्रांत स्वयंसेवकांनी निभावलेली निर्णायक भूमिका महत्त्वाची असून यासाठी इतिहास साक्षीदार आहे. महात्मा गांधींच्या 'सर्वोदय' आणि 'सार्वजनिक कल्याण' या संकल्पनांनी स्वयंसेवेचे व्यापक आणि वैज्ञानिक रूप स्पष्ट केले. आधुनिक काळातील स्वयंसेवा ही केवळ लोककल्याणापुरती मर्यादित नसून, ती पर्यावरण, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, बालहक्क, मानवाधिकार, अपंगकल्याण, प्राणीसंवर्धन, आपत्ती व्यवस्थापन, आणि जनसहभागाच्या सर्व बाबींमध्ये अत्यंत परिणामकारक ठरलेली आहे. सामाजिक बांधिलकी जपण्याची भूमिका निभावताना स्वयंसेवक समाजातील विषमता आणि अन्यायाविरुद्ध जनजागृती करतात, सत्ता आणि प्रशासनाला उत्तरदायी ठेवतात, तसेच दुर्लक्षित समुदायांना आधार देण्यासाठी पुढाकार घेतात.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता स्वयंसेवा सामाजिक भांडवल निर्माण करते. समाजातील विश्वास, नातेसंबंध आणि एकात्मता वाढविण्यात स्वयंसेवेची क्षमता अद्वितीय आहे. स्वयंसेवक जेव्हा एखाद्या समस्येला भिडतात, तेव्हा ते फक्त त्या समस्येचा उपचार करत नाहीत, तर त्या समस्येच्या कारणांचा वेध घेतात. त्यामुळे सामाजिक बदलाची प्रक्रिया गतीमान होते. स्वयंसेवेचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे या माध्यमातून नागरीकांमध्ये 'असण्याची' आणि 'योजनेचा सक्रिय भाग असल्याची' भावना मजबूत होते. हीच भावना व्यक्तीला समाजाच्या विकासात स्वतःचे अस्तित्व अधोरेखित करण्याची प्रेरणा देते.

स्वयंसेवेची आवश्यकता आज अधिक तीव्रतेने जाणवते कारण जग वेगाने बदलत आहे. तंत्रज्ञान आणि अर्थकारणाच्या झपाट्याने होणाऱ्या वाढीमुळे अनेक नवीन सामाजिक प्रश्नग उभे राहत आहेत. बेरोजगारी, मानसिक आरोग्य, कुपोषण, नैसर्गिक आपत्ती, डिजिटल दरी, भटक्या विमुक्त समुदायांचे प्रश्न, वृद्धांची काळजी, मुलांवरील अत्याचार, सायबर गुन्हे, जलवायू परिवर्तन आणि प्रदूषण अशा अनेक समस्या सरकार किंवा प्रशासन एकटी हाताळू शकत नाहीत. हे सत्य आपण कोविड–१९ महामारीच्या काळात प्रत्यक्ष अनुभवले, जेव्हा स्वयंसेवकांनी आरोग्य यंत्रणेसोबत हातात हात घालून मोठ्या प्रमाणात जनतेला मदत केली. रुग्णालयांमध्ये मदत, अन्नदान, औषध व ऑक्सिजनची उपलब्धता करून देणे, जनजागृती मोहीमा, समुपदेशन या सर्व आघाड्यांवर कार्यरत असलेल्या स्वयंसेवकांनी समाजातील आशेचा दिवा प्रज्वलित ठेवला.

आज स्वयंसेवा ही युवांची ओळख बनत चालली आहे. तरुणाईच्या ऊर्जेला योग्य दिशा देणारी ही एक महत्त्वाची संधी आहे. राष्ट्रीय सेवा योजना (NSS), राष्ट्रीय छात्रसेना (NCC), रेडक्रॉस, स्काउट–गाईड, युवा मंडळे, स्वयंसेवी संस्था (NGO) यांच्या माध्यमातून लाखो युवक समाजकार्यात सक्रिय झाले आहेत. त्यांच्या माध्यमातून निर्माण झालेले नेतृत्व सामाजिक परिवर्तनाचे इंजिन बनले आहे. स्वयंसेवा युवकांना जीवनदृष्टी देताना समाजाला विकासाचा हात देत राहते. तरुणांची नवोन्मेषी विचारशक्ती आणि स्वयंसेवेची संवेदनशीलता यांचे एकत्रीकरण हे समाजहिताचे सर्वात मजबूत सूत्र आहे.

पण स्वयंसेवेच्या या तेजस्वी चित्रामागे काही आव्हाने देखील आहेत. अनेक स्वयंसेवी संस्था पारदर्शकतेअभावी किंवा राजकीय स्वार्थाच्या विळख्यात अडकतात, तर काही ठिकाणी स्वयंसेवकांचे शोषणही होते. योग्य प्रशिक्षण, सुरक्षा आणि मानसिक आधाराची कमतरता दिसून येते. तसेच, स्वयंसेवा ही फक्त सामाजिक प्रतिमा निर्माण करण्याचे साधन आहे, असा गैरसमजही कुठेकुठे आढळतो. म्हणूनच स्वयंसेवेचे संस्थाकरण करताना मूल्यशिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण, तसेच नैतिक तत्वांचा आग्रह ही आवश्यक बाब आहे. स्वयंसेवा म्हणजे फक्त फोटो काढून सामाजिक माध्यमांवर टाकणे नव्हे; तर प्रत्यक्ष जिथे तुटलेल्या हातांना आधार द्यायचा आहे, जिथे डोळे आसवे पुसण्याची वाट पाहत आहेत, जिथे एखादी आकांक्षा उजेडाच्या शोधात आहे, तिथे पोहोचणे हे स्वयंसेवेचे खरे ध्येय आहे.

स्वयंसेवेची व्यापक स्वीकार्यता वाढवण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने आपली भूमिका जागृत केली पाहिजे. कुटुंबातील मूल्यशिक्षण, शाळा–कॉलेजमधील सामाजिक उपक्रम, प्रशासनाची सहकार्यनीती, माध्यमांची सकारात्मक भूमिका, आणि नागरी समाजाचे भान या सर्वांचा समन्वय आवश्यक आहे. व्यक्तीच्या विकासात स्वयंसेवेची थेट भूमिका आहे कारण स्वयंसेवा व्यक्तीला आत्मनिष्ठा, संवेदनशीलता, जबाबदारीची जाणीव, नेतृत्वगुण आणि सामाजिक ज्ञान यांचे भांडार उपलब्ध करून देते. त्यातून निर्माण होणारी 'सोशल आयडेंटिटी' व्यक्तीचे जीवन अधिक अर्थपूर्ण करते.

मानवतेचे अस्तित्व टिकवायचे असेल, तर समाजात परस्पर सहकार्याची संस्कृती अधिक दृढ करावी लागेल. स्वयंसेवेची शक्ती ही फक्त देण्यात नसून जोडण्यात आहे. ती वर्ग, जात, धर्म, भाषा, लिंग, वंश अशा सर्व भिंती मोडून टाकते आणि सर्वांना समान दर्जा देते. स्वयंसेवक जेव्हा एखाद्या घरात अन्नाचा तुकडा पोहोचवतात, तेव्हा त्या घरातील माणसांमध्ये समाजाविषयी विश्वास निर्माण होतो. जेव्हा ते एखाद्या मुलाला शिक्षण मिळवून देतात, तेव्हा त्या मुलाच्या भविष्यात आशेचा दिवा पेटतो. जेव्हा ते जखमी निसर्गाला वृक्षारोपणाद्वारे मोबदला देतात, तेव्हा पृथ्वीचा श्वास दीर्घकाळ टिकतो. ही शक्ती कोणत्याही योजना, बजेट किंवा धोरणाने निर्माण केली जाऊ शकत नाही ती फक्त मनाने दिलेली असते.

'आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक दिन' आपल्याला आठवण करून देतो की प्रत्येक व्यक्ती समाजासाठी महत्त्वाची आहे. आपल्या थोड्याश्या प्रयत्नात कोणाचातरी संपूर्ण जग दडलं असतं. आज जगात करोडो स्वयंसेवक आपली स्वार्थरहित सेवा देत आहेत आणि मानवी मूल्यांचा झेंडा उंचावत आहेत. त्यांची ही कृतिशीलता समाजाला दिशा देते, मानवतेला आधार देते आणि भविष्यासाठी आशेचा किरण ठरते. या दिवशी समाजातील सर्व स्वयंसेवकांचे मनःपूर्वक अभिनंदन करून आपण सर्वांनीही आपल्या क्षमतेनुसार समाजासाठी काहीतरी करण्याचा संकल्प करायला हवा.

जग बदलण्यासाठी मोठ्या क्रांतींची गरज नसते; एखादी छोटी सेवा, एखादे घेतलेले पाऊल, एखादे समजूतदार नाते – एवढ्यानेही परिवर्तनाची प्रक्रिया सुरू होते. कधी कधी एखाद्याची स्मितही जग बदलू शकते. म्हणूनच, आजचा दिवस



आपल्याला पुन्हा एकदा सांगतो सेवा हीच मानवतेची खरी भाषा आहे. आपण सर्वांनी एकमेकांसाठी जगलो, तर जगही आपल्यासाठी जगेल. मनाची उदारता म्हणजेच स्वयंसेवा, आणि स्वयंसेवा म्हणजेच मानवतेचा सर्वात सुंदर चेहरा होय. या व्रताला, या संस्काराला, या मानवी मूल्याला शतशः वंदन!

– **डॉ.राजेंद्र बगाटे,** (लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)



युवान 'मिशन विद्या संजीवनी'ने दिला ६०० पूरग्रस्त विद्यार्थ्यांना आधार शालेयोपयोगी साहित्य देवून आधार दिला.

# युवान 'मिशन विद्या संजीवनी'कडून ६०० पूरग्रस्त विद्यार्थ्यांना 'आधार'

नगर – अचानक आलेल्या पुराच्या संकटाने शेवगाव आणि पाथर्डी तालुक्यातील अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले. भविष्यात पुन्हा पाय रोवण्याची झुंज सुरू असताना, सर्वांत जास्त तडाखा बसला तो निरागस विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला. यात विद्यार्थ्यांचे शाळेची बॅग, वह्या–पुस्तके, गणवेश, अभ्यास साहित्य पाण्यात वाहून गेले. शाळेची वाट देखील बंद पडली. अशा वेळी पूरग्रस्त नागरिकांना तातडीचा आधार देण्यासोबत युवान संस्थेने 'मिशन विद्या संजीवनी' या हृदयस्पर्शी उपक्रमामार्फत ६०० ग्रामीण विद्यार्थ्यांना परिपूर्ण शैक्षणिक साहित्य देऊन नवी आशा रूजवली. भारतीय विमा कर्मचारी सेना, पुणे यांनी यासाठी विशेष सहाय्य केले. त्यांच्या ३०० आजी– माजी कर्मचाऱ्यांनी त्यासाठी योगदान दिले.

शेवगाव तालुक्यातील देवटाकळी, भायगाव, कोळगाव तसेच पाथर्डी तालुक्यातील कोरडगाव, मुखेकरवाडी, कोळसांगवी या गावांतील जिल्हा परिषद शाळांमध्ये हा उपक्रम पार पडला. पूरामुळे झालेल्या नुकसानीनंतर विद्यार्थ्यांना पुन्हा शाळेत रुजू होण्यासाठी आवश्यक असलेले शालेय दप्तर, प्रत्येकी १० वह्या, पेन, पेन्सिल, कंपास बॉक्स, पाण्याची बाटली, कलर सेट, ड्रॉईंग बुक आणि टीफिन बॉक्स असे संपूर्ण साहित्य मुलांना देण्यात आले. साहित्य हातात मिळताच मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य पाहून शिक्षक आणि ग्रामस्थ भावूक झाले.

शाळेतील एका शिक्षकाने सांगितले, पूरात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक साहित्य वाहून गेले. अनेक विद्यार्थी त्यामुळे शाळेत येत नव्हते. आज नविन साहित्य मिळणार म्हणून ते शाळेत हजर झाले. आज मिळालेल्या या साहित्यामुळे त्याच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास परत आला.

युवान संस्थेचे संस्थापक संदीप कुसळकर म्हणाले, पूरग्रस्त नागरिकांना २ महिन्यापूर्वी तातडीचे मदत साहित्य वाटप करतांना विद्यार्थ्यांचे झालेले नुकसान जवळून पाहिले. त्याच वेळ 'युवान मिशन विद्या संजीवनी' उपक्रमामार्फत किमान ५०० विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पुनर्वसन करण्याचा संकल्प केला होता. तो आज युवान मित्र परिवार आणि विशेषतः भारतीय विमा कर्मचारी सेनेच्या सहाय्याने पूर्णत्वास नेला. संकटग्रस्त विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटविलेल्या हास्याने मनस्वी समाधान लाभले.

भारतीय विमा कर्मचारी सेनेचे अध्यक्ष शशिकांत वाकणकर, सुनील देसाई, प्रफुल्ल सुदामे, स्वाती हेजीब, संध्या पाठक, अभय चंद्रस, माधुरी चंद्रस, रामदास भदिंगरे, गोपाळकृष्ण चौधरी, मोरे आणि पुणे, मुंबई विभागातील कार्यकर्ते, स्थानिक ग्रामपंचायत सदस्य, शिक्षकवर्ग आणि युवानचे स्वयंसेवक या उपक्रमात उपस्थित होते. समाजातील प्रत्येक घटकाने मदत केली तर कोणतेही संकट शिक्षणाच्या आड येऊ शकत नाही, हा सुंदर संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

### शिक्षकांचेही मनापासून कौतुक

देवटाकळी केंद्रातील एका शिक्षिकेने सांगितले, देवटाकळी केंद्रातील एका शिक्षिकेने भावना व्यक्त केली– पूरानंतर मुलांमध्ये भीती, असुरक्षितता, खिन्नता दिसत होती. आज त्यांना नवे साहित्य मिळाले आणि त्यांच्या डोळ्यातील चमक पाहून आम्हीही भारावलो. त्यांच्यात शिकण्याबद्दल निश्चितच पुन्हा प्रेरणा निर्माण झाली. स्थानिक ग्रामस्थांनी दोन्ही संस्थांचे आभार मानले. पूरग्रस्त गावांत तातडीचा आधार देण्यासोबत विद्यार्थ्यांना नवी उभारी दिल्याबद्दल आम्ही ऋणी आहोत, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. तसेच भविष्यात देशसेवेसाठी अन्नदाता म्हणून उभी राहण्याची गरज पडल्यास आम्ही युवान सोबत कायम उभे राहू, अशी ग्वाही दिली.



हर्ष धाडगे याचा सत्कार करताना हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक आदी.

# हर्ष धाडगेच्या कामगिरीने सारडा कालेजच्या नावलौकिकात भर

नगर – सारडा महाविद्यालयाचा हर्ष धाडगे (११ वी सायन्स) याने त्रिपुरा येथे झालेल्या ५७ वी शालेय राष्ट्रीय बुद्धीबळ चॅम्पियनशिप स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी करीत यश संपादन करून शालेय राष्ट्रीय बुद्धीबळ स्पर्धेत तीसरा क्रमांक मिळवून पेमराज सारडा महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर घातली आहे. हर्ष ने राष्ट्रीय शालेय स्पर्धेतही चांगली कामगिरी करून तिसरा क्रमांक मिळवला होता, असे प्रतिपादन हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांनी केले आहे.

त्रिपुरा येथे झालेल्या राष्ट्रीय बुद्धीबळ स्पर्धेत पेम राज सारडा कॉलेज चा हर्ष धाडगे (११वी सायन्स) या विद्यार्थ्यांने पाच (सामने) स्पर्धा खेळून हर्ष धाडगे ने रँकिंग मध्ये येऊन तीसरा क्रमांक मिळवून ब्रांझ पदक मिळविले. या यशाबद्दल हिंद सेवा मंडळाचे वतीने हर्ष धाडगे चा सत्कार हिंद सेवा मंडळ चे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वरीष्ठ महाविद्यालयचे चेअरमन डॉ. रमेश झरकर, मानद सचिव संजय जोशी, ज्युनिअर कॉलेज चेअरमन डॉ. पारस कोठारी, जेष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा, अजीत बोरा, ॲड. फडणीस, सुमतीलाल कोठारी, प्राचार्या डॉ. माहेश्वरी गावित, प्रबंधक अशोक असेरी, उपप्राचार्य गिरीश पाखरे, सुपरवायझर डॉ.कुमावत, डॉ.रिकल, एम आर कुलकर्णी सर्वांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या. हर्ष धाडगे याला प्रा.संजय धोपावकर, प्रा.संजय साठे (क्रीडा संचालक) यांचे मार्गदर्शन लाभले.

याप्रसंगी चेअरमन डॉ.पारस कोठारी म्हणाले, सारडा महाविद्यालयातील खेळाडूंना नेहमीच प्रोत्साहित केले जाते. विद्यार्थ्यांचा खेळात सहभाग असावा.तसेच विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये यश संपादन करावे यासाठी हिंद सेवा मंडळाचे सर्व पदाधिकाऱ्यांचे सहकार्य मिळत असते. हर्ष घाडगे यांने राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत ब्रांझ पदक मिळवून चमकदार कामगिरी केली ही महाविद्यालयासाठी अभिमानास्पद बाब आहे.

# महानगरपालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना आणि सुतिका गृहच्यावतीने जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती

नगर – अहिल्यानगर महापालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह यांच्या वतीने जागतिक एड्स दिनानिमित्त आयोजित कार्यशाळेत नागरिकांमध्ये एड्सबाबत जनजागृती करण्यावर विशेष भर देण्यात आला.



महापालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह यांच्या वतीने जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती करण्यात आली. (छाया – लहू दळवी)

कार्यक्रमाचे उद्घाटन ए.आर.टी. विभागाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. कल्पना पोहरे यांच्या हस्ते झाले. त्या म्हणाल्या, एड्सबाबत समाजात अनेक समज–गैरसमज होते. पूर्वी रुग्णसंख्या वाढल्याचे दिसत होते; मात्र शासनाच्या सातत्यपूर्ण जनजागृतीमुळे आज एड्सवरील प्रतिबंध यशस्वीपणे साध्य होत आहे. योग्य औषधोपचारांमुळे रुग्ण दीर्घकालीन निरोगी आयुष्य जगू शकतो. प्रत्येकाने काळजी घेतली, तर एड्समुक्त राज्य निर्माण करणे कठीण नाही.

यानंतर वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपमाला चव्हाण यांनी नागरिकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, वेळेत उपचार घेतल्यास एड्स आजार नियंत्रित करता येतो. महिलांनी विशेष काळजी घेतली पाहिजे. शासनाच्या माध्यमातून या आजारावरची औषधे पूर्णपणे मोफत उपलब्ध आहेत. एड्स बाधित गर्भवती महिलांनी वेळेवर उपचार घेतल्यास त्यांच्या बालकाला एड्स होत नाही, ही अतिशय महत्वाची बाब आहे.

कार्यक्रमात आरोग्य विभागातील अधिकारी–कर्मचारी म्हणून संजय डोईफोडे, अनिल पवार, राहुल दौंडे, झांबरे मॅडम आदी उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी एड्सविषयी जनजागृतीची शपथ घेतली. यावेळी विखे फाउंडेशन नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी शहरातून एड्सविषयी जनजागृती रॅली काढत नागरिकांना काळजी, उपचार आणि प्रतिबंध याबाबत माहिती दिली. रॅलीमुळे शहरात जागतिक एड्स दिनाचे औचित्य अधिक प्रभावीपणे अधोरेखित झाले.

सुत्रसंचालन बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिकागृह यांच्याकडून करण्यात आले. अधिकारी आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळे हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

# अहमदनगर कॉलेजमध्ये रक्तदान शिबिर उत्साहात, विद्यार्थ्यांचा सहभाग; ४७ दात्यांकडून मानवतेची सेवा

नगर – अहमदनगर कॉलेज, अहिल्यानगर येथे राष्ट्रीय सेवा योजना (NSS), रेड रिबन क्लब (RRC), राष्ट्रीय छात्र सेना (NCC), विद्यार्थी कल्याण मंडळ आणि सिव्हिल हॉस्पिटल ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. बी पी एच ई संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस आणि सचिव विशाल बार्नबस यांच्या प्रेरणेने आणि प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे नियोजन करण्यात आले.



अहमदनगर कॉलेज, अहिल्यानगर येथे राष्ट्रीय सेवा योजना (NSS), रेड रिबन क्लब (RRC), राष्ट्रीय छात्र सेना (NCC), विद्यार्थी कल्याण मंडळ आणि सिव्हिल हॉस्पिटल ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले.

उद्घाटन सोहळ्यात सिव्हिल हॉस्पिटल ब्लड बँक वैद्यकीय अधिकारी डॉ. सुमैया खान, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रीतमकुमार बेदरकर, प्रा. दिलीपकुमार भालसिंग, विनानुदानित विभागप्रमुख डॉ. सय्यद रझाक तसेच इतर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाच्या रजिस्ट्रार श्रीमती कल्पलता भिंगारदिवे यांच्या हस्ते झाले.

उद्घाटनावेळी श्रीमती भिंगारदिवे म्हणाल्या की, रक्तदान ही मानवतेची सर्वोच्च आणि सर्वात आवश्यक सेवा आहे. एका व्यक्तीच्या नियमित रक्तदानामुळे अनेकांचे जीव वाचू शकतात. समाजातील तरुणांनी अशा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणे हे काळाची गरज आहे आणि त्यांची ही सामाजिक जाणीव अभिमानास्पद आहे. अहमदनगर कॉलेज नेहमीच समाजाभिमुख उपक्रमांना प्रोत्साहन देत आले आहे. NSS, NCC, RRC आणि विद्यार्थी कल्याण मंडळ यांनी दाखवलेला समन्वय, शिस्त व नियोजन आदर्शवत आहे. आजचे रक्तदाते हे उद्याचे जीवनदाते आहेत. त्यांच्या या योगदानाने 'रक्तदान हे महादान' ही भावना अधिक दृढ होते.

सिव्हिल हॉस्पिटल ब्लड बँकच्या वैद्यकीय पथकाने दात्यांची प्रकृती तपासून, योग्य सुरक्षा आणि स्वच्छता नियमांचे पालन करत रक्तसंकलन केले. या शिबिरात एकूण ४७ जणांनी रक्तदान केले. रक्तदानानंतर दात्यांना अल्पोपहार देण्यात आला तसेच त्यांच्या सामाजिक योगदानाची दखल घेत प्रशस्तिपत्रक वितरित करण्यात आले.

या उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजना (NSS), राष्ट्रीय छात्र सेना (NCC) आणि विद्यार्थी कल्याण मंडळ या विभागांचे विशेष सहकार्य लाभले. महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख डॉ. माधव जाधव, प्रा. झरिना सय्यद, प्रा. अभिषेक सांगळे, प्रा. सीमा तिकोने तसेच सर्व विभागांच्या विद्यार्थ्यांनी शिबिरात सक्रिय सहभाग नोंदवला. स्वयंसेवकांनी रक्तदात्यांचे मार्गदर्शन करणे, रांगा व्यवस्थापित करणे आणि संपूर्ण परिसर स्वच्छ ठेवण्याचे कार्य केले.

उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी कल्याण मंडळाचे अधिकारी डॉ. भागवत परकाळ यांनी केले तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रविकिरण लाटे यांनी केले.

# 'महाराष्ट्र शुद्ध देशी गोवंश सन्मान योजने'साठी प्रस्ताव सादर करावे; १० डिसेंबर अंतिम मुदत

नगर – महाराष्ट्र राज्यातील नोंदणीकृत गोशाळा व गोवंश संवर्धनाचे काम करणाऱ्या संस्था व पशुपालकांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने 'महाराष्ट्र शुद्ध देशी गोवंश सन्मान योजना' जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत जिल्हास्तरीय पुरस्कारांसाठी विहित नमुन्यातील प्रस्ताव १० डिसेंबर पर्यंत सादर करण्याचे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. उमेश पाटील यांनी केले आहे.

महाराष्ट्र गोसेवा आयोगामार्फत सन २०२५–२६ या वर्षापासून दरवर्षी ही योजना राबविण्यात येत आहे. राज्यात शुद्ध देशी गोवंशाचे संवर्धन, संरक्षण आणि कल्याण करणाऱ्या संस्था व व्यक्तींच्या कार्याचा गौरव करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

असे आहेत पुरस्कारांचे स्वरूप : या योजनेअंतर्गत जिल्ह्यासाठी एकूण दोन पुरस्कार देण्यात येणार आहेत:

१. पहिला पुरस्कार: आयोगाकडील नोंदणीकृत गोशाळांमधून एका गोशाळेची निवड केली जाईल.

२. दुसरा पुरस्कार: शासकीय/खाजगी गोवंश संवर्धन संस्था, गोवंश प्रक्षेत्रे, कृषी विद्यापीठे, पशुवैद्यक विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्र, शेतकरी पशुपालक समूह गट किंवा वैयक्तिक गोपालक यांच्यातून एकाची निवड केली जाईल.

निवड झालेल्या संस्थांना प्रजासत्ताक दिनी (२६ जानेवारी) सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल.

निवडीचे निकष : पुरस्कार निवडीसाठी संस्थेचे किंवा व्यक्तीचे मागील पाच वर्षांतील कार्य पाहिले जाईल. यामध्ये आत्मनिर्भर गोशाळा, शुद्ध गोवंश पैदास, प्राकृतिक शेतीचा प्रसार, गो–उत्पादनांची निर्मिती, आणि बायोगॅस/सौरऊर्जा वापर यांसारख्या विविध निकषांवर गुणांकन केले जाईल.

प्रस्ताव सादर करण्याचे ठिकाण : इच्छुक व पात्र संस्थांनी विहित नमुन्यातील अर्ज आणि आवश्यक कागदपत्रांसह आपले प्रस्ताव १० डिसेंबर पर्यंत 'जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय कार्यालय, अहिल्यानगर' येथे सादर करावेत. अर्जाचा नमुना आणि अधिक माहिती कार्यालयात उपलब्ध आहे. विहित मुदतीनंतर आलेले प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र संस्था व गोपालकांनी या योजनेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन डॉ. उमेश पाटील यांनी केले आहे.

# रोबोटिक गुडघा प्रत्यारोपण

सध्या जिकडेतिकडे रोबोटिक, रोबोटिक असे ऐकायला येत आहे. रोबोट म्हणजे काही असे मशीन नाही की मशीन आपल्या बाजूला किंवा आपण मशीनच्या आत जायचे अन् आपोआप ऑपरेशन होईल. तर नेमके हे रोबोट काय आहे याचा हा सर्व वाचकासाठी एक माहितीपूर्ण लेख.



## एआय रोबोटचा अर्थ काय आहे?

एआय रोबोट्स हे असे रोबोट आहेत जे कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) वापरून, समजून घेण्यासाठी, शिकण्यासाठी आणि कार्ये करण्यासाठी वापरतात. यांना एकदा आपण कामाचा क्रम, आज्ञाची मालिका किंवा क्रम दिला कि त्या प्रमाणे तो ते काम बिन चूक पार पाडतो. ह्यात कॉम्पुटर आहेत, त्यामुळे त्यांना समज, निर्णय घेण्याची क्षमता आहे आणि समस्या सोडवणे यासारख्या मानवासारख्या क्षमता आहेत. गणिताच्या भाषेत ते आपल्या पेक्षा फास्ट आहेत. तर हि आहे गुगल आधारित व्याख्या. सांधा बदल शास्त्र क्रिया या अशा आज्ञांची मालिका आहे. ज्यात गणित त्रिमिती आणि नैसर्गिक शरीर शास्त्रचे ज्ञान आवश्यक आहे. रोबोट ला आणि त्याच्या कॉम्पुटरला हे ज्ञान आपणच फीड करायचे असते. सांध्याचे ज्ञान, जो सांधा आपण बसवणार आहोत त्याचे ज्ञान रोबोटच्या कॉम्पुटरला दिले कि डॉक्टरचे काम रोबोटच्या सहय्याने शस्त्रक्रिया अचूक पार पडणे. शस्त्र क्रिया डॉक्टर लाच करावी लागते. रोबोट फक्त हेल्प करतो, जसा कॅलक्युलेटर हिशोब करायला मदत करतो... रोबोट कॅलक्युलेट करतो लाईन अंगल अणि लांबी. माझ्या एक मित्राने विचारले कॉम्पुटर फेल झाले तर काय ? तो रोबोटची हिरोईन असलेला एक चित्रपट तेरी बातो मे उलझे लिया हा पाहून आला होता. ज्यात रोबोटचे काम कृती सैनोन केले तर शहीद कपूर हिरो आहे. सर्व काम रोबो करणार असेल तर मग अनुभवी सर्जन चे काम काय ? रोबोट हँग. होत नाही त्यात वायरस होणे, कॉम्पुटर हँग होणे हे होत नाही. म्हणूनच आपण जागतिक पातळीवर सिद्ध झालेला आंतरराष्ट्रीय रोबोट घेतला आहे. इंडिअन रोबोट हि उपलब्ध आहेत. कुठल्याही हिप किंवा नी सर्जरीत तीन सांध्याची आणि दुसऱ्या बाजूच्या सांध्याशी आलायीनमेंट महत्वाची असते.

तर आपण आपला रोबोट काय आहे हे पाहू. आपला रोबोट हा ब्रिटीश कंपनी स्मिथ अंड नेफू कंपनीचा आहे. हा अतिशय सिम्पल रोबो आहे. हा इन्फ्रा रेड कॅमेराद्वारे बॉडीशी कनेक्ट होतो. फिमर या हाडाला दोन पिन लाऊन आरे फिट केले जातात. तसेच टीबिया किंवा नडगीच्या हाडाला अंकले आणि हिपची अलाईनमेंट महत्वाची. हिप सेंटर काढणे आणि सगळ्या सांध्याची नैसर्गिक रितीने जोडणे महत्वाचे असते.

## रोबो म्हणजे काय ?

रोबो चे दोन प्रकार आहेत इमेज लेस रोबो यात रियल टाईम म्हणजे शस्त्रक्रिया चालू असताना सतत रोबोटचे मार्गदर्शन घेणे. दुसरा प्रकार असतो आधी सिटी स्कॅन करा, यात सिटी स्कॅनचा खर्च व त्रास, व रेडीयेशन चा धोका वाढतो. त्यात सिटी स्कॅनचे ॲनालिसीस मध्ये गडबड होण्याच्या चुका होऊ शकतात. त्यामुळे माझ्या मते हा सगळ्यात उत्तम. त्यामुळे साईदीपमध्ये असलेले रोबो सर्वात उत्तम रोबोचे मूळ ३ भाग पडतात १ कॅमेरा, २ संपर्क यंत्रणा ३) मॅपिंग प्रोब आणि ४) बरिंग, किंवा मिलिंग सिस्टीम. पहिला भाग जो रोबोचा इन्फ्रारेड कॅमेरा म्हणजे त्याचा डोळा द्वारे आपल्या शरीराशी संपर्क तयार करतो. ज्यात पिन अन आरेय द्वारे रोबोटशी संपर्क प्रस्थापित होतो. हा इन्फ्रा रेड अति हाय स्पीड कॅमेरा आहे. यातील प्रत्येक भाग एकमेकाशी वायरलेस अरे द्वारे जोडला जातो. आपण ज्याचे ऑपरेशन करणार त्रिमितीय चित्र निर्माण करतो. अगदी रुग्णा च्या हाडाचा तंतोतंत स्केल ते स्केल, एकदा भूल दिली कि निर्जंतुकीकरण करून सर्जन शस्त्रक्रिया सुरु करतो. छेद देणे, बोन पर्यंत शस्त्रक्रिया नेऊन सोडणे. इथून रोबोटचा वापर सुरु होतो. रोबो सर्व प्रथम हाडाच्या प्रत्येक भागवर रोबोटचा प्रोब (आर्म) फिरवून प्रत्येक सरफेसला स्पर्श करून हाडाचे ३ डी म्हणजे त्रिमितीय चित्र तयार करते. या चित्राचे रोबोट च्या कृत्रिम बुद्धीमत्तेद्वारे आणि आपल्या मदतीने लाखो केसेसचा डाटा वापरून आपल्याला एक प्लॅन देतो. तो प्लॅन आपल्या बुद्धीमत्ते बरोबर, आणि अनुभव याच्या मदतीने फायनल करायचा असतो. माणसाच्या बुद्धीमत्तेला आणि डोळ्याला मायनर फरक समजत नाही. रोबो मात्र अगदी ०.५ डीग्री आणि ०.५ मी मी पर्यंतचे डिस्टन्सचा फरक ओळखतो. आणि तितके करेक्ट अंग्यूलेशन करून देतो. जेव्हा आपल्याला दोन्ही गुडघे एक साथ ऑपेरेट करायचे असतात व दोन्हीचे सातत्य, सारखे पणा राखणे गरजेचे असते. तेव्हा रोबोट आवश्यक असतो. रोबोट मुळे थोडा खर्च जास्त होतो पण तो सत्कारणी आहे. रोबोट मुळे सांध्यांचे आयुष आणि समाधान वाढणार आहे. साधारण सांध्याचे आयुष्य २५ वर्ष, आणि रोबोटचा खर्च प्रती वर्ष १ ते २ हजार रुपयेच पडतो. रोबोमुळे लवकर रिकव्हरी होते. शस्त्रक्रियेच्या वेदना कमी होतात. रक्तस्त्राव कमी होतो. रोबोटचे असे बरेच फायदे असतात.

रोबोट हे काही मार्केटिंगचे गिमिक नाही. याचा खरा फायदा रुग्णांना खुर्ची वरून उठतांना त्रास होत नाही. अलायीनमेंट मिळते. चालणे सुधारते. सांधा लॉंग लास्टिंग होतो. आणि मूळ सांधा नैसर्गिक फील राहतो.

रोबोट स्वतः कुठला छेद घेत नाही, नाईफ वापरत नाही. रोबोट फक्त हाडाला शेप देतो. खराब झालेला व झिजलेला भाग व्यवस्थित शेप करून सांध्याची साईझ सुचवतो. सर्जन ट्रायल घेऊन सांधा बोन सिमेंट द्वारे फिट करतो. हे सिमेंट आपण दातात सिमेंट भरतो त्याच्यापेक्षा जास्त क्षमतेचे असते.

## रोबोटची आवश्यकता काय ?

रोबोट नव्हते तेव्हा हा शस्त्रक्रिया जिगच्या सहाय्याने करीत असतो. कुठलाही नवा शोध नवे तंत्रज्ञान आले कि त्याबद्दल सर्वात आधी ही चर्चा नक्की होते. प्रत्येकाला आपला कंम्फर्ट झोन अजिबात सोडायचा नसतो. नी रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया गेले ५० वर्ष आणि हिप रिप्लेसमेंट गेली ६० ते ७० वर्षापासून वैद्यकीय शास्त्रात घट्ट पाय रोउन उभ्या आहेत आणि गेल्या शतका तील महत्वाचा शोध म्हणून पुढे आले आहेत. शास्त्र सतत प्रगती करते ते प्रवाही असते.

## सांधा म्हणजे काय ?

दोन हाडाचा एकत्र येऊन सांधा तयार होतो. सांध्यात दोन हाडे एकमेकाजवळ लीगामेंट कॉम्प्लेक्सने बांधलेले असतात. दोन हाडाचा गुळगुळीत भाग एकमेकावर हालचाल करतो. या गुळगुळीत भागाला कार्टीलेज असे म्हणतात. ही हालचाल व्यवस्थित होण्यासाठी वंगण आवश्यक असते. वंगण कमी झाले को हालचालीवर लोड येऊन सांधा घासतो. हाडांचे आवरण खराब होते. जोपर्यंत हे गुळगुळीत आवरण शिल्लक असते, तोपर्यंत त्याचे लुब्रीकेशन वंगण व्यवस्थित होते. सांधा झिजायला लागला कि सांध्याचे वंगण कमी होते. वंगण कमी झाले कि आणखी झीज वाढते. काही लोक वंगण कमी झाले म्हणून तेल तूप जास्त खातात. गंमत आहे, ते योग्य नाही. तेल आणि तूप मर्यादित च असावे.

## रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया म्हणजे काय ?

सांध्याचे झिजलेले भाग बदलून त्याच मापाचे भाग त्याच कोनात बसवायचे, त्याच साईझ मध्ये बसवायचे. ती आलयीनमेंट नैसर्गिक असावी लागते. अन्यथा सांधा लवकर झिजतो. हे भाग कोबाल्ट क्रोमियम किंवा टायटानियमचे असतात. मांडीच्या हाडा साठी वेगळा भाग आणि पायाच्या हाडा साठी वेगळा भाग असतो. या दोन्ही चा सांध्या हाय डेनसिटी पोली वापरले जाते. या पोलिचा वापर विमानात होतो. हा झिजत नाही व गुळगुळीत असतो. या हायडेन्सिटी म्हणजे उच्च घनता असलेल्या पॉलीमध्ये व्हिटॅमिन ई सुद्धा संयुक्त केलेले असते.

**खुब्याचा सांधा बदलणे –** खुब्याचा सांधा हा उखळीचा सांधा आहे हे सर्वांना माहितीच आहे. यात फिमर या हाडावर बाल असतो तर सॉकेट हे पेल्व्हिस किंवा खुबा ओटीपोटाच्या हाडावर असते. कप धातूचा असतो जो प्रेस फिट सिमेंट फिट असू शकतो. बॉलचे विविध प्रकार असतात. ते त्यात काय मटेरियल वापरले त्यानुसार असते सेरामिक मेटल सांधा सेरामिक किंवा पोली म्हणजे सेरामिक ऑन सेरामिक सेरामिक ओन पोली मेटल ऑन पोली. अजून एक त्यात बारकावा म्हणजे सिमेंट किंवा नो सिमेंट.आपल्याला काय योग्यआहे हा निर्णय डॉक्टरवर सोपवावा. डॉक्टरशी चर्चा करावी. रोबोमुळे सांध्याचे कोन, त्रिमिती आणि ऑफसेट लांबी रचना आणि कार्य सुधारते.

**फिजिओ थेरपी –** या प्रत्येक ऑपरेशन मध्ये रुग्णाची फिजिओ (म्हणजे व्यायाम) करण्याची तयारी असणे आवश्यक आहे. व्यायाम हा पुनर्वसनाचा जीव प्राण आत्मा आहे. फ़िजिओ म्हणजे नुसते शेकणे किंवा मालिश नाही, तर स्नायू चे व्यायाम. चांगले चालण्याची ट्रेनिंग. व्यायाम नाही केला कि पूर्ण समाधान आणि पूर्ण हालचाल मिळत नाही. लांगाडणे येते. स्नायू कमजोर झाले तर सांधा दीर्घ काळ टिकत नाही.

मांडी घालणे. याबद्दल डॉक्टरशी प्रत्यक्ष चर्चा करावी. प्रत्येक रुग्ण वेगळा असतो. जिना चढणे, गाडी चालवणे, दोनचाकी, चारचाकी इत्यादी तसेच वॉक रोजच्या ॲक्टिव्हिटी निर्वेधपणे करता येतात. पण कुणी फूटबॉल, बॅडमिंटन दोरीवर उड्या नाही, अगदी चांदबीबीचा माळ रोज चढता येते, थोडक्यात, गुडघ्याचा खुब्याचा सांधा बदलणे हे रुग्णाच्या दृष्टीने वरदान आहे.

**रिस्क :** कुठलीही शस्त्रक्रिया निर्जोखमी नसते. सर्व तपासण्या काळजी पूर्वक निर्णय आणि अनुभव याच्या जीवावर धोक्याचे प्रमाण कमी होते. आपल्या अपेक्षा आणि वस्तू स्थिती यातले अंतर जितके कमी तितके समाधान अधिक.

**– डॉ. व्ही. एन. देशपांडे,** ऑर्थोपेडिक अँड जॉइंट रिप्लेसमेंट सर्जन, मो. ९८२२३०१०३०



नगर जिल्ह्यातील पहिली मिट्रल वाल्व (ह्दयाची झडप) बदलण्याची जटील शस्त्रक्रिया साईदीप सहयाद्री हॉस्पिटलमध्ये डॉ. अभिषेक राजपोपट व डॉ. किरण दिपक यांच्या टीमने यशस्वी केली.

# ह्दयाचे मिट्रल वाल्व बदलण्याची जिल्ह्यातील पहिली शस्त्रक्रिया 'साईदीप सह्याद्री'मध्ये यशस्वी

नगर – नगर जिल्ह्यातील पहिली मिट्रल वाल्व (ह्दयाची झडप) बदलण्याची जटील शस्त्रक्रिया साईदीप सहयाद्री हॉस्पिटलमध्ये डॉ. अभिषेक राजपोपट व डॉ. किरण दिपक यांच्या टीमने यशस्वी केली मिट्रल वाल्व ट्रान्सकॅथेटरच्या साहाय्याने बदलण्यात आले.

नगर मधील ६७ वर्षीय महिलेला दीर्घाकाळ त्रास होत होता. २०१७ मध्ये त्यांची बाय पास शस्त्रक्रिया झाली होती. पुन्हा त्रास होत असल्याबाबत त्यांनी डॉ. आर आर धूत यांचा सल्ला घेतला त्यांनी डॉ. किरण दीपक (कार्डीयोलॉजिस्ट) यांचकडे या पेशंट बाबत काय करता येईल असा सल्ला घेतला असता त्यांना मिट्रल वाल्व (झडप) अंजियोग्राफी मार्गातून बदलण्याची शस्त्रक्रिया करावी लागेल असा सल्ला दिला व साईदीपसह्याद्री हॉस्पिटल कार्डीयाक टीम ने हे आवाहन स्वीकारून डॉ. अभिषेक राजपोपट यांच्या सोबत ट्रान्सकॅथेटर वापरून हे अवघड शस्त्रक्रिया यशस्वी रित्या पूर्ण केली. या मध्ये पूर्वीच्या कमी क्षमतेने काम करणाऱ्या मिट्रल वाल्व मध्ये रक्तवहिनी मध्ये कॅथेटर च्या साहाय्याने दुसरे नवीन वाल्व सोडून पूर्वीच्या मिट्रल वाल्व मध्ये दुसरे वाल्व बसवण्यात आले. ही शस्त्रक्रिया कोणतीही चीरफाड अथवा टाके न घालता केवळ मांडीतून ट्रान्सकेटर च्या साहाय्याने ह्दयाची मिट्रल झडप बदलली. जी एक जटील शस्त्रक्रिया आहे ती अत्याधुनिक कॅथलॅब व कार्डीक ऑपरेशन थिएटरमुळे हे ऑपरेशन शक्य झाले.

साईदीप सह्याद्री हॉस्पिटल चे चेअरमन डॉ. दीपक एस एस व त्यांचे सहकारी संचालक डॉक्टर्स यांच्या दूरदृष्टी मुळे अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर व सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली या सुविधे मुळे ही अत्यंत जटील शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात कार्डीक टीमला यश आले. यावेळी डॉ. श्रीधर बधे, डॉ. अजय झोरे, डॉ. अलबीन पौल, डॉ. राहुल एरंडे, डॉ. भूमिका गोयल, डॉ. भाग्यश्री राऊत, डॉ. दीपक मुनोत, डॉ. रवी शेळके, भरतराज डेंगळे, विजय बिडवे, अमरीन शेख, स्वप्नील मनःतोंडे, दीपक साळवे, संतोष सांगळे इत्यादी कार्डीयाक टीमचे सदस्य उपस्थित होते. पेशंटला तीन दिवसात पूर्ण आराम वाटल्याने हॉस्पिटलमध्ये डिस्चार्ज करण्यात आले अशी माहिती डॉ. किरण दीपक यांनी दिली.

# वेदांतनगरमधील श्रीदत्त देवस्थानमध्ये दत्तजयंती सोहळा उत्साहात; भाविकांची गर्दी

नगर – येथील प्रेमदान चौकामधील वेदांतनगरमधील क्षीरसागर महाराजांच्या भगवान श्रीदत्त मंदिरात श्रीदत्त जन्मोत्सव सोहळा दुपारी १२ वाजता भक्तिपूर्ण वातावरणात साजरा झाला. हा सोहळा डोळ्यात साठवण्यासाठी भाविकांनी गर्दी केली. देवस्थानमधील प्रथेप्रमाणे वेदांत विद्यापीठाच्या पाठशाळेमधील विद्यार्थ्यांना देवस्थानचे विश्वस्त सचिव संजय क्षीरसागर, विश्वस्त देवराज काशीकर, आसाराम दरोडे, प्रदिप जोशी आणि पुरूषोत्तम कुलकर्णी यांच्या हस्ते लक्ष्मीमंडपात नवीन वस्त्रांची भेट देण्यात आली. देवस्थानमधील जन्मोत्सवाची लगबग वाढत गेली. भारतभरासह अमेरिका येथून आलेल्या गुरूबंधू–भगिनींनी भगवान श्रीदत्तात्रेयांचे आणि श्रीगुरूदेवांचे दर्शन घेण्यासाठी शिस्तबध्दतेने रांगा लावल्या होत्या. सोहळ्यासाठी श्रीदत्तक्षेत्र केळीच्या खुंटांनी, फुलांच्या तोरणांसह फुलांच्या रांगोळ्या आणि विद्युत दिव्यांच्या रोषणाईने सुरेख सजवले होते. पहाटे ५.३० वाजता श्रीदत्तक्षेत्रमध्ये भगवान श्रीदत्तात्रेयांच्या मूर्तीवर १०८ लिटर दुधाचा पवमान (लघुविष्णु) अभिषेक करण्यात आला. यावेळी श्रीदत्तयाग सोहळ्याचे ब्रम्हवृंद, देवस्थानमधील अर्चक, पाठशाळेमधील विद्यार्थी, विश्वस्त आणि कर्मचारी उपस्थित होते. अभिषेक सुरू असताना नगर सत्संग महिला भजनी मंडळाने भजन म्हणण्याची सेवा श्रध्देने केली. सकाळी ७ वाजता बिरूदावली, प्रार्थना व आरती होऊन दर्शनास प्रारंभ झाला.



२८ नोव्हेंबरपासून सुरू असलेल्या दत्तयागाची पूर्णाहुती ४ डिसेंबरला सकाळी ११ च्या सुमारास विधीवत करण्यात आली. वेदमूर्ती संदिप टेंगसे (गोवा) यांचेसह १२ ब्रह्मवृंदांनी पौरोहित्य केले. देवस्थानचे विश्वस्त पुरूषोत्तम कुलकर्णी यांनी यागाचे यजमानपद भूषविले.

सकाळी ११.१५ ते १२ या वेळेत श्रीदत्तक्षेत्रमधील भगवान श्रीदत्तात्रेय मंदिराच्या सभामंडपात चतुर्वेद सेवा झाली. यागाच्या ब्रह्मवृंदांसह देवस्थानच्या पाठशाळेतील विद्यार्थी चतुर्वेद सेवेत सहभागी झाले होते. दुपारी १२ वाजता जन्मोत्सव साजरा करण्यात आला. फुलांनी सुशोभित केलेल्या पाळण्यात भगवान श्रीदत्तात्रेयांची बालरूपातील आकर्षक मूर्ती स्थानापन्न करण्यात आली होती. महाआरती होताच उपस्थित भाविकांनी फराळ प्रसादाचा लाभ घेतला. दुपारी ४ ते ५.३० दरम्यान दत्तकृपा इमारतीच्या तिसरे मजल्यावर सत्संग मंडळांनी पाद्यपूजा सेवा केली. विश्वस्त मंडळ आणि वेदान्त विद्यापीठाच्या अध्यापकांनीही पाद्यपूजा सेवा केली. चतुर्वेद सेवाही झाली. श्रीगुरूदेवांचे ध्वनीफित आशीर्वाद ऐकवण्यात आल्यावर आरती होऊन पसायदानाने या सोहळ्याची सांगता करण्यात आली. सायंकाळी ६.४५ ते ७.३० दरम्यान सामुदायिक महाआरती होऊन ७.३० ते रात्री ९ या वेळेत पालखी सोहळा भावपूर्ण वातावरणात झाला. थंडी असल्याने भाविक ऊबदार कपडे परिधान करून पालखी सोहळ्यात सहभागी झाले होते. पालखी सुरू असताना गायक भाविकांनी गायनसेवा तर वादक भाविकांनी वाद्य वादन सेवा केली.

देवस्थानचे विश्वस्त सचिव संजय क्षीरसागर, विश्वस्त देवराज काशीकर, आसाराम दरोडे, तुषार कर्णिक, पुरूषोत्तम कुलकर्णी, दिनेश पटवर्धन, प्रदिप जोशी, राजन जोशी, वेदान्त विद्यापीठाचे प्रधानाचार्य वेदमूर्ती समिहन कोल्हटकर गुरूजी, अध्यापक वृंद तसेच व्यवस्थापक त्र्यंबक वैकर आणि कर्मचारी वृंदांनी दत्त जन्मोत्सव सोहळ्याच्या उत्तम नियोजनासाठी परिश्रम घेतले. विविध भागांमधून स्त्री–पुरूष भाविक आले होते.

# प्रवीणऋषिजींच्या मार्गदर्शनात ५ जानेवारीपासून अर्हम लिविंग सर्वश्रेष्ठ जीवनशैली उपक्रम सुरू



आजच्या या तंत्रज्ञानाच्या स्पर्धात्मक युगात, धकाधकीच्या जीवनात प्रत्येक क्षेत्रातील चढाओढीच टेंशन, एक्झाम स्ट्रेस, आर्थिक अडचणी, भविष्याची चिंता, शारीरिक अस्वास्थ्य, नात्यांची गुंतागुंत, पारिवारिक तणाव सामाजिक दबाव या सर्व परिस्थितीत आजच तरूण वर्ग मानसिकरित्या खचत चाललेली दिसतो. जिथे मनं विखुरलेली आहेत, विचार अनियंत्रित आहेत आणि भावना गोंधळलेल्या आहेत अशा प्रत्येक तरुणाच्या मनात स्वतःच्या कर्तुत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रत्येक घटीकेला तो एक परीवर्तनाचा, सर्वांगीण विकासाचा आशेचा किरण शोधत असतो जो त्याला सफलता, समाधान आणि आनंद देइल. वास्तव सत्य हे आहे की आपण बाहेरील जगात कसे वागायचे आहे हे आपल्या आतील जगात निश्चित केले जाते... अंतःकरण विकार– नकारात्मकता युक्त असेल तर व्यवहार पण नकारात्मक होनार. अंतरंग सकारात्मक भावनेने युक्त असेल तर निश्चित अशा व्यक्तिची मति–कृति सकारात्मक, सौहार्दपूर्ण असते. भावनात्मक तणाव, भीती, चिंतेचा प्रभाव त्याच्या व्यवहारिक जीवनावर होतो.

ऊंच आकाशात उडायचे असेल तर फक्त पंखात बळ असुन चालत नाहीं तर धाडस पण लगते. व्यक्ती केशरचना, कपडे, वागण्याच्या पद्धती बदलुन आपल व्यक्तिमत्व बाहेरून बदलु पाहतो परंतु केवळ बाह्या परिवर्तन हे तात्कालिक असते तर अंतर परिवर्तन जरूरी आहे, अंतर परिवर्तन हे अंतर–बाह्य व स्थाई असते म्हणुनच आज अंतर परिवर्तनाची नितांत आवश्यकता आहे. असे हे अंतर–बाह्य परिवर्तन करण्याची एक सुवर्ण संधी म्हणजे अर्हम लिविंग– श्रेष्ठतम जीवन जगण्याची कला।

अर्हम विज्या प्रणेता प्रवीणऋषिजी महाराज हे ५ जानेवारीपासून हा कोर्स सुरू करणार असून या २१ दिवसीय यात्रेत जीवन बदलणारी सूत्रे, मनावर नियंत्रण ठेवण्यासाठी सोपी तंत्रे, त्वरित प्रभावी, साधे व्यावहारिक प्रयोग करून घेतले जातील हा फक्त एक कार्यक्रम नाही – हा एक अनुभव आहे जो विचार, वर्तन आणि जीवन – तिन्ही बदलतो. फक्त २१ दिवसांत आपले आतील जग श्रेष्ठतम आणि अधिक शक्तिशाली बनवण्याची कला शिकण्याची सुवर्ण संधी आहे गुरुदेव प्रवीणऋषी यांच्या मार्गदर्शनाखाली २१ दिवसांचा प्रवास –अर्हम लिविंग

हा १८ ते ४० वयोगटातील सर्व जाती धर्माच्या बंधु, भगिनींसाठी खुला आहे. इच्छुकांनी त्वरित खाली नंबर व संपर्क साधुन आपले नाव नोंदवावे, असे आवाहन अर्हम विज्ञा फ़ाउंडेशनद्वारे करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी खालील नंबरवर संपर्क साधा.

९९२१६२९५५०,८७८८७९३०८३, ९८९०८१६३२८



किसनगिरीनगरच्या गुरुदत्त भक्तीधाममध्ये दत्त जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

# गुरुदत्त भक्तीधाममध्ये दत्त जयंती उत्साहात

नगर – श्री दत्तात्रय भगवान व श्री समर्थ सदुरु किसनगिरी बाबांच्या कृपाशिर्वादाने, गुरूवर्य भास्करगिरी महाराज व ह.भ.प. स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज श्रीक्षेत्र देवगड यांच्या प्रेरणेने नगर येथील किसनगिरीनगर येथे असलेल्या गुरुदत्त भक्तिधाम मध्ये भगवान दत्तात्रयांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. पाईपलाईन रोड येथील संत किसनगिरीनगर येथे गुरुदत्त भक्तिधाम मंदिरामध्ये दत्तजयंती निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई, आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. दत्तजयंती निमित्त मंगळवारी सकाळी ६ ते ८ या वेळेत अभिषेक नित्यपुजा व आरती होऊन सकाळी अभंगावली ग्रंथाचे पारायण व महाआरती करण्यात आली. दुपारी सामुदायिक हरिपाठ करण्यात आला. सायंकाळी श्री दत्त जन्मावरील अभंग वाचन करून ह.भ.प. गोरक्षनाथ दुतारे महाराज यांनी प्रवचन केले. यावेळी पुष्पवृष्टी करून भगवान दत्तात्रयांचा जन्म सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी सुवासिनींनी पाळणा दोरी ओढून पाळणा म्हटला. या नंतर मंगलमय वातावरणात भगवान दत्तात्रयांची महाआरती करण्यात आली. महाआरतीनंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी नगर शहर व परिसरातील हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

यावेळी आमदार संग्राम जगताप, संपत बारस्कर, सागर बोरुडे, कांडेकर महाराज यांनी मंदिराला भेट दिली.

# स्वामी समर्थ मंदिरात दत्त जयंती उत्सवाची सांगता

नगर – सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवरील अक्कलकोट निवासी वटवृक्ष श्री स्वामी समर्थ सेवा संस्थेच्या वतीने दत्त जयंती निमित्त आयोजित पारायण सोहळ्याची सांगता श्री दत्तयाग, जन्म सोहळा, भजन संध्या, महाप्रसादाने करण्यात आली. या पारायण सोहळ्यास महिलांनी सहभाग नोंदवून श्री गुरुचरित्र पारायण केले. दत्त जयंती निमित्त पहाटे श्रींना रुद्राभिषेक करण्यात आला. श्री दत्तयाग प्रसंगी सेवेकरी श्री. व सौ. कीर्ती पंकज गुजराथी यांच्या हस्ते होमहवनास आहुती देण्यात आली. त्याचे पौराहित्य निखिल देवरे गुरुजी यांनी केले. सायंकाळी सहा वाजता दत्त जन्म सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी भाविक उपस्थित होते. याप्रसंगी आदेश चव्हाण यांनी धाव धाव श्री स्वामी समर्थ यावर भक्ती गीते सादर केली.

दत्त जयंती निमित्त सामाजिक उपक्रम म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास प्रतिसाद मिळाला. दुपारी महाआरती होऊन महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. जन्मोत्सव सोहळ्यास भाविकांनी मंदिरात दर्शनास गर्दी केली होती. मंदिराच्या वतीने सर्व सेवेकरी, कार्यकर्ते यांनी परिश्रम घेऊन या सोहळ्याची सांगता केली.



गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिरात दत्त जयंती निमित्त श्रीदत्त याग पार पडला. सेवेकरी श्री. व सौ. कीर्ती पंकज गुजराथी यांनी आहुती दिली. निखिल देवरे यांनी पौराहित्य केले (छाया – विजय मते)

# महंत भास्करगिरी महाराजांकडून उद्योजक गोविंद जोशी यांचा सत्कार

नगर – सावेडीच्या बन्सी महाराज मिठाईवाले फार्मचे संचालक गोविंद जोशी यांना छत्रपती संभाजीनगर येथील उद्यम इन्फो सोल्युशन्स तर्फे उद्यम सह्याद्री पुरस्कार २०२५ हा राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. यानिमित्ताने देवगड देवस्थानचे महंत भास्करगिरी महाराज यांनी देवगड येथील श्री दत्त मंदिरात गीविंद जोशी यांचा सत्कार करून आशीर्वाद देत अभिनंदन केले. यावेळी चितळे उद्योग समूहाचे अध्यक्ष संजय चितळे, बुधानी वेफर्सचे संचालक दिलीप बुधानी व लक्ष्मी नारायण चिवडाचे संचालक प्रशांत दाता, अमित अग्रवाल, भाऊसाहेब हजारे, प्रदीप बाफना, रविंद्र सारूख व संदीप साबळे उपस्थित होते.



सावेडीच्या बन्सीमहाराज मिठाईवाले फार्मचे संचालक गोविंद जोशी यांना छत्रपती संभाजीनगर येथील उद्यम इन्फो सोल्युशन्सतर्फे उद्यम सह्याद्री पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल देवगड देवस्थानचे महंत भास्करगिरी महाराज यांनी त्यांचा सत्कार करून आशीर्वाद देत अभिनंदन केले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## मनाचे विचारविश्व



आपल्या मेंदूला ५ ते १० मिनिटांपर्यंत पुरेसे ऑक्सिजन मिळाले नाही तर त्याची स्थिती बिघडू शकते. मेंदू कायमस्वरूपी निकामा होऊ शकतो. मेंदू आपल्या शरीराच्या आकाराच्या तुलनेत खूप छोटा असतो. मात्र, आपल्या पूर्ण शरीरातील रक्त आणि ऑक्सिजनचा २० टक्के हिस्सा फक्त मेंदूच वापरत असतो. याच मेंदूवर केलेल्या एका ताज्या संशोधनात असे आढळून आले आहे की, रोज आपल्या मनात ६० हजार विचार येत असतात. आपल्या मेंदूचा विकास ४० व्या वर्षापर्यंत अविरत सुरूच असतो, असेही यात संशोधकांनी नमूद केले आहे.

एरवी, लहान मुले बराच काळ झोपतात, हे आपण नेहमी पाहिले आहे. संशोधकांनी याचेही कारण विशद केले आहे. त्यांच्या मते, छोट्या मुलांच्या शरीरात तयार होणाऱ्या ग्लुकोजपैकी ५० टक्के हिस्सा त्यांचा मेंदूच वापरत असतो. यामुळे लहान मुलांच्या झोपेचे प्रमाणही अधिक असते. या संशोधनानुसार रोज आपल्या मनात ६० हजार विचार येत असतात आणि आश्चर्य म्हणजे त्यापैकी ७० टक्के विचार हे नकारात्मक असतात.

संशोधकांनी असेही म्हटले आहे की, जे लोक स्मार्टफोनचा सातत्याने, प्रदीर्घ वेळेपर्यंत वापर करतात, त्यांच्या मेंदूत ट्यूमर होण्याचा धोका सर्वाधिक असतो. शरीराच्या तुलनेत मेंदूच्या आकाराचा निकष समोर ठेवला तर सर्व प्राण्यांपेक्षा मनुष्याच्या मेंदूचा आकार अधिक मोठा असतो, असेही यात आढळून आले आहे. हत्तीचा मेंदू त्याच्या शरीराच्या तुलनेत केवळ ०.१५ टक्के इतकाच असतो. त्या तुलनेत मनुष्याच्या मेंदूचा आकार मात्र त्याच्या शरीराच्या तुलनेत २ टक्के इतका असतो.

या संशोधनात पुढे असे नमूद आहे की, आपण जर असे मानले की, आपण पुरेशी व उत्तम झोप घेतली आहे तर आपला मेंदूदेखील ती बाब सहजपणे स्वीकारतो. आपल्या मेंदूत ऐमिग्डाल नावाचा एक हिस्सा असतो. तो मेंदूतून बाहेर केल्यास आपल्या मेंदूतील कोणत्याही गोष्टीची किंवा घटकाची असणारी भीती किंवा धास्ती कायमची निघून जाते. सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे आपल्या मेंदूतील अर्धा हिस्सा शस्त्रक्रिया करून काढून टाकला जाऊ शकतो आणि याचा आपल्या स्मरणशक्तीवर किंचितही फरक पडणार नाही!

## अंतराळस्थानकात वायुगळती



आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकामुळे (आयएसएस) 'नासा'चे टेन्शन वाढले आहे. गेल्या पाच वर्षांपासून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात किरकोळ वायू गळती होत होती; मात्र आता किमान ५० ठिकाणी गळतीची समस्या उद्भवल्याचे स्पष्ट झाले असून या केंद्राला तडेदेखील जात असल्याची माहिती पुढे आली आहे. नासाने केलेला तपास अहवाल लीक झाला असून त्यात ही माहिती पुढे आली आहे. यामुळे गेल्या काही महिन्यांपासून आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात अडकून पडलेल्या सुनीता विल्यम्ससह आणखी काही अंतराळवीरांचा जीव धोक्यात आला आहे. पृथ्वीच्या कक्षेत फिरणाऱ्या आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या प्रयोगशाळेला सूक्ष्म हादरे बसत असल्याचा दावा रशियाने केला आहे. यावर नासाचे म्हणणे आहे की, अंतराळ स्थानकातून मोठ्या प्रमाणात हवा बाहेर पडत आहे, ही धोक्याची घंटा आहे. मात्र, या केंद्रात अडकून पडलेल्या अंतराळवीरांचे प्राण वाचवण्यासाठी आणि या लिकेजवर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आयएसएसमधील गळतीची समस्या गेल्या पाच वर्षांपासून आहे.

सगळ्यात पहिली वायू गळती ही डॉकिंग पोर्टवर जाण्यासाठी अंतराळ स्थानकात तयार करण्यात आलेल्या पहिल्या यावेझदा मॉड्यूलमधून सुरू झाली. या भागाचे नियंत्रण रशियाच्या हातात आहे. मात्र, गळतीचे खरे कारण काय याबाबत नासा आणि रशियन स्पेस एजन्सी रोस्कोमोस यांच्यात अद्याप सहमती झालेली नाही. सीएनएनने दिलेल्या वृत्तानुसार, नासाचे अंतराळवीर बॉब कबाना यांनी सांगितले की, अंतराळ संस्थेने या गळतीबद्दल चिंता व्यक्त केली आहे. गळती थांबविण्यासाठी काही प्रयत्न केल्यास या समस्येपासून काही काळ दिलासा मिळू शकेल, पण त्यापासून कायमस्वरूपी तोडगा काढता येणार नाही, असे कबाना यांनी सांगितले. सध्या आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक सुरक्षित नसल्याचे अमेरिकेचे म्हणणे आहे. ही गळती २०१९ मध्ये पहिल्यांदा आढळून आली होती. त्यानंतर एप्रिल २०२४ पासून दररोज १.७ किलो वेगाने हवेची गळती सुरू झाली. साधारणपणे आयएसएसवर सात ते दहा अंतराळवीर असतात. रशियन संशोधकांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात सूक्ष्म कंपणं जाणवत असल्याचे म्हटले आहे. हा धोका टाळण्यासाठी नासाने काही पावले उचलली आहेत. याशिवाय आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात असलेले अंतराळवीर देखील अतिरिक्त खबरदारी घेत आहेत.


## वादळानं झुकलं जहाज



कधीही न बुडणारे जहाज अशी जाहिरात करून जलप्रवासाला निघालेले 'टायटॅनिक' जहाज आपल्या पहिल्याच सफरीत अवघ्या चारच दिवसांच्या प्रवासानंतर हिमनगाला धडकून अटलांटिक महासागरात बुडाले होते. शंभर वर्षापूर्वीच्या या दुर्घटनेच्या कटू आठवणी आजही कायम आहेत. आता याच अटलांटिक महासागरात अचानक वादळ आल्याने भलेमोठे 'रॉयल कॅरिबियन क्रूझ' चक्क ४५ अंशांनी झुकले, ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. अचानक जहाज पाण्यात झुकल्याने क्रूझ जहाजातील प्रवाशांना जीव मुठीत धरून राहावे लागले. या घटनेत क्रूझ जहाजातील अनेक वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

क्रूझ हायव्ह यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना ७ नोव्हेंबर २०२४ रोजी रॉयल कॅरेबियनच्या 'एक्सप्लोरर ऑफ द सीज' या क्रूझ शीपबाबत घडली. चक्रीवादळाच्या वाऱ्यांमुळे १ लाख ३७ हजार ३०८ टन वजनाचे हे जहाज एका बाजूला झुकले. या घटनेनंतर प्रवाशांमध्ये घबराट पसरली. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओत प्रवासी जीव धरून इकडे-तिकडे धावत आहेत. प्रवाशांना सरळ उभे राहण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. याशिवाय, जहाजामधील अनेक वस्तू एका बाजूने दुसऱ्या बाजूला सरकताना दिसत आहेत. क्रू मेंबर्स घाबरलेल्या प्रवाशांना शांत करण्याचा प्रयत्न करत आहे. या व्हिडीओत जहाजावरील अनेक वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे पाहायला मिळत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हे जहाज क्रू मेंबर्स जवळपास ५ हजार प्रवाशांना घेऊन प्रवास करत असताना ही घटना घडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. परंतु, काही प्रवासी आणि क्रू मेंबर्सला किरकोळ दुखापत झाली. त्यांच्यावर प्रथमोपचार करण्यात आले. या घटनेनंतर क्रू मेंबर्सनी प्रवाशांना पुन्हा एकदा आपल्या खोलीत जाण्यास सांगितले. हा व्हिडीओ १० नोव्हेंबर २०२४ रोजी 'एक्स' म्हणजेच जुन्या ट्विटरवर शेअर करण्यात आला. या व्हिडीओला आतापर्यंत जवळपास ३० दशलक्ष लोकांनी पाहिला आहे. या व्हिडीओवर नेटकरी मोठ्या प्रमाणात कमेंट करत आहेत. या घटनेनंतर प्रवाशांनी सोशल मीडियावर आपला अनुभव शेअर केला. एका व्यक्तीने लिहिले आहे की, 'मी देखील याच जहाजात होतो. त्यावेळी डायनिंग रूममधील परिस्थिती भयानक होती. सगळ्या प्लेटस्? फुटल्या होत्या आणि जेवण सगळीकडे पसरले होते. लोक आरडाओरडा करीत होते.'

## छातीत दुखण्याची मिमांसा छातीत




छातीत दुखणे ही समस्या हृदयविकाराचा झटका आणि हृदयाशी संबंधित अन्य परिस्थितीशी संबंधित आहे. तथापि, प्रत्येक वेळी छातीत दुखण्याचे एकमेव कारण हृदयविकाराची स्थिती नसते. छातीत दुखण्याची अनेक कारणे आहेत आणि प्रत्येकाला वेगवेगळ्या कारणामुळे छातीत दुखते, असे तज्ज्ञ सांगतात. तथापि, छातीत दुखणे कोणत्याही प्रकारे दुर्लक्षित केले जाऊ नये कारण त्याचे परिणाम गंभीर असू शकतात.

छातीत दुखण्याची काही कारणे : अपचन-अनेक वेळा अन्न खाल्ल्यानंतर लोकांना छातीत तीव्र वेदना जाणवतात. हे ॲसिडिटी आणि अपचनामुळे असू शकते. स्नायू दुखणे- जर छातीत दुखणे वारंवार आणि एकाच ठिकाणी किंवा एकाच प्रकारचे वाटत असेल तर ते स्नायू दुखणे (मसल पेन) असू शकते.

**हृदयविकाराचा झटका :** हृदयविकाराच्या झटक्यादरम्यान छातीत दुखू शकते. यामध्ये छातीत अचानक तीव्र वेदना आणि अस्वस्थता यासारख्या समस्या उद्भवू शकतात. त्याच वेळी, जेव्हा हृदयविकाराचा झटका येतो तेव्हा छातीत खूप दाब, जडपणा जाणवू शकतो. छातीत दुखण्यासोबत, हृदयविकाराच्या झटक्याशी संबंधित काही इतर लक्षणे जाणवू शकतात जसे- हात दुखणे, जबड्यात दुखणे आणि दात दुखणे, पाठ आणि पोट दुखणे, अचानक जास्त घाम येणे आणि श्वास लागणे. एनजाइना : ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये ऑक्सिजन आणि रक्त योग्य प्रमाणात हृदयापर्यंत पोहोचत नाही. यामुळे छातीत घट्टपणा आणि दाब तसेच पोट आणि पाठदुखी यासारख्या समस्या उद्भवू शकतात. हृदयविकाराच्या झटक्यासारखी काही लक्षणे एनजाइनामध्ये देखील दिसू शकतात, जसे की घाम येणे किंवा श्वसनाचा त्रास.

## केळाची भीती वाटणारा मंत्री



कुणाला कशाचा फोबिया म्हणजेच भयगंड असेल हे काही सांगता येत नाही. खरं तर आपल्या प्रत्येकाला कसली ना कसली भीती वाटत असते. कुणाला अंधाराची, तर कुणाला बंद लिफ्ट अगदी झुरळ, पालीचीही भीती वाटणारी माणसं आपल्या आजूबाजूला आपण पाहिली आहे, पण तुम्ही कधी ऐकलं आहे किंवा बघितलं का, की फळांची आणि तेही केळीसारख्या फळाची कोणाला भीती वाटू शकते. तर हो, स्वीडनच्या सरकारमधील एक मंत्री महिला आहेत, त्यांना केळी दिसलं की त्या अस्वस्थ होतात. त्यांना 'बनाना फोबिया' आहे! स्वीडनच्या लैंगिक समानता खात्याच्या मंत्री पॉलिना ब्रँडबर्ग यांना हा विचित्र फोबिया आहे. त्या केळं खाणे सोडाच, केळाचं नाव घेतलं तरी अस्वस्थ आणि बेचैन होतात. त्यामुळे त्यांना नजरेसमोर केळं येऊ नये म्हणून खूप काळजी घेतली जाते. कारण केळं दिसलं की त्या थरथर कापतात. एका महिला मंत्रीला अशा विचित्र गोष्टीची भीती वाटणे हे अतिशय थक्क करणारी गोष्ट आहे. पण यामागील कारणही अतिशय महत्त्वाचं आहे. खुद्द पॉलिना यांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर २०२० मध्ये तिला बनाना फोबियाबद्दल एक पोस्ट शेअर केली होती. खरं तर ती पोस्ट काही दिवसांनी डिलीट करण्यात आली होती. पण या पोस्टमध्ये त्यांनी स्पष्टपणे सांगितलं होतं की, त्यांना 'बनाना फोबिया' आहे म्हणजे त्यांना केळाचं नाव घेतली तरी भीती वाटते. त्याशिवाय ही गोष्ट अशा प्रकारे लिक झाली की, एक्स्प्रेसन या स्थानिक मीडिया आउटलेटच्या हाती एक इमेल्स लागलं. त्यात मंत्री पॉलिना यांच्या व्हीआयपी लंचबाबत सूचना देण्यात आल्या होता. त्याशिवाय त्यांच्या अधिकृत दौऱ्यादरम्यान त्या जिथे जिथे जातील तेथील कर्मचाऱ्यांना सांगण्यात आलं होतं की, त्यांना केळी दिसणार नाही याची व्यवस्था करावी. मंत्री पॉलिना यांनीही एक्स्प्रेसनला त्यांच्या फोबियाबद्दल सांगितलं होतं. त्यांनी सांगितलं की, ही एक भीती असून एखाद्या ॲलर्जीसारखा हा आजार असतो. यासाठी वैद्यकीय मदतही घ्यावी लागते. खरं तर अशा प्रकारची भीती बसण्यामागील कारण अजून डॉक्टरांनाही माहिती नाही. मात्र बालपणीची कुठल्या घटना किंवा अनुभवानंतर ही भीती बसू शकते, असा डॉक्टरांचा अंदाज आहे.

## उबदार कपड्यांची अलॅर्जी आहे?



हिवाळा ऋतू सुरू होताच आपण उबदार आणि लोकरीच्या कपड्यांकडे वळतो. थंडीच्या दिवसात शरीर उबदार राहण्यासाठी लोकरीचे स्वेटर घालण्यास सुरुवात करतो. परंतू अनेकांना लोकरीच्या कपड्यांची ॲलर्जी होत असते. त्यामुळे शरीरात बारीक पुरळ होण्याच्या समस्या निर्माण होतात. तसेच कपड्याच्या ॲलर्जीने अनेकांना सर्दी होते. लोकरीच्या कपड्यांची खास गोष्ट म्हणजे ते परिधान केल्याने शरीराजवळ थंड हवा जाऊ देत नाही आणि थंडीपासून बचाव होतो, पण ते परिधान करण्यापूर्वी काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. याबाबत तज्ज्ञांनी दिलेल्या खास टीप्स...

**कॉटन इनर घाला :** जेव्हा तुम्ही लोकरीचे कपडे घालत असाल तेव्हा प्रथम पूर्ण स्लीव्जचे कॉटन इनर घाला. यानंतर लोकरीचे कपडे घालावेत. यामुळे लोकरीचे कपडे त्वचेच्या थेट संपर्कात येणार नाहीत आणि पुरळ उठण्याची समस्याही उद्भवणार नाही.

**मॉइश्चरायझर लावा :** लोकरीचे कपडे घालताना जास्त त्रास होत असेल तर त्वचेतील कोरडेपणा हेदेखील एक कारण असू शकते. अशावेळी लोकरीचे कपडे घालण्यापूर्वी शरीरावर मॉइश्चरायझरचा वापर करावा. यामुळे पुरळ किंवा लालसरपणा देखील येणार नाही.

**ऑलिव्ह ऑईल :** थंडीमध्ये तुमच्या त्वचेवर खूप ॲलर्जीचा त्रास होत असेल तर ऑलिव्ह ऑईल लावा. याशिवाय रात्री झोपताना व्हिटॅमिन ई युक्त नाइट क्रीम शरीर आणि चेहऱ्यावर मॉइश्चरायझ करा.

**फॅब्रिक्सची काळजी घ्या :** लोकरीच्या कपड्यांमध्येही अनेक फॅब्रिक्स येतात. अशावेळी तुमच्या त्वचेनुसार लोकरीचे कपडे घाला. शुद्ध लोकर केसाळ असते. जास्त धागे सुटलेले लोकरीचे कपडे शक्यतो टाळा. त्वचेवर धागे घासल्याने त्रास होऊ शकतो. अशावेळी त्वचेवर ताण पडतो व त्या ठिकाणी पुरळ येऊ लागतात.

## हळदीचा अर्क कर्करोगावर गुणकारी



अनेक भारतीय मसाले आरोग्यासाठी गुणकारी असतात. त्यामध्येच हळदीचा समावेश होतो. हळदीमधील 'क्युरक्युमिन' हा घटक कर्करोगावर गुणकारी असल्याचे अनेक संशोधनांमधून दिसून आलेले आहे. कर्करोग म्हणजे पेशींची अनियंत्रित वाढ. हळदीचा अर्क हा कर्करोगाच्या पेशी मारण्यासाठी उपयुक्त असतो, असेही एका संशोधनात दिसून आले होते. या संशोधनानुसार हळदीत क्युरक्युमिन हे संयुग असते व ते वेगळे काढून त्याचा वापर कर्करोगग्रस्त पेशी मारण्यासाठी करता येतो. आतापर्यंत क्युरक्युमिन हे गुणकारी असल्याचे माहीत असूनही त्याचा परिणामकारक वापर करता येत नव्हता, असे इलिनॉइस विद्यापीठाचे प्राध्यापक दीपंजन पान यांनी म्हटले होते. जेव्हा तुम्ही औषध देता तेव्हा ते पाण्यात विरघळणारे असले पाहिजे, अन्यथा ते रक्तप्रवाहात मिसळू शकत नाही, असे संशोधक संतोष मिश्रा यांनी सांगितले. उटाह विद्यापीठातील संशोधकांसह काहींनी प्लॅटिनमच्या मदतीने क्युरक्युमिनची विद्राव्यता वाढवली व त्याचा वापर केला असता ते द्रावण मेलानोमा व स्तनाच्या कर्करोगासह इतर कर्करोगांवर शंभरपट जास्त प्रभावी दिसून आले. क्युरक्युमिन या संयुगामुळे स्टॅट ३ या मार्गिकेची फॉस्फोरिलेशन कमी होऊन कर्करोगाच्या पेशींची वाढ मंदावते. क्युरक्युमिन व प्लॅटिनम यांचा एकत्र वापर केल्याने डीएनएचे तुकडे होऊन कर्करोग पेशी मारल्या जातात. कर्करोग उपचारात औषधांची विद्राव्यता ही मोठी अडचण असून, तो अडथळा दूर करणे आवश्यक आहे. कर्करोगाच्या मूलपेशी मारणेही या तंत्राने शक्य असून, त्यामुळे हा रोग परत डोके वर काढणार नाही अशी व्यवस्था करता येईल, असा दावा प्रा. पान यांनी केलेला आहे.

## हिरेजडी सँडल.. किंमत १२३ कोटी!

हल्ली सोन्यासारखा राजधातू असो किंवा हिऱ्यामाणकांसारखी मौल्यवान रत्ने असोत, त्यांचा कुठे व कसा वापर केला जाईल हे काही सांगता येत नाही. कमोडपासून मोबाईलपर्यंत अनेक ठिकाणी या मौल्यवान वस्तूंचा उपयोग झालेला आहे. त्यामधून अगदी पादत्राणेही सुटलेली नाहीत. दुबईमध्ये जगातील सर्वात महागडी सँडल लाँच करण्यात आली होती. याची किंमत ऐकून तुम्ही थक्क व्हाल. खलील टाईम्सच्या वृत्तानुसार, हिरे आणि सोन्याच्या या सँडलची किंमत १२३ कोटी रुपये आहे.

ही सँडल डिझायन करायला तब्बल ९ महिन्यांचा कालावधी लागला. या सँडलला 'फॅशन डायमंड शू' असे नाव देण्यात आले आहे. या सँडलवर शेकडो हिरे लावण्यात आले आहे. त्याशिवाय १५-१५ कॅरेटचे दोन इम्पोजिंग डी-फ्लॉलेस डायमंडळही लावले आहे. सँडलची ही जोडी युएईतील जदा दुबाई आणि फॅशन ज्युलर्स यांनी तयार केली आहे. जदा दुबईतील एक नामांकित ब्रँड आहे. बुर्ज अल अरब या ७ स्टार हॉटेलमध्ये या महागड्या सँडलचे अनवरण झाले होते. रिपोर्टस्नुसार, ही सँडलची सध्या जगातील सर्वात महागडी आहे. याआधी डेबी विन्घम हाय हिल्स जगातील सर्वात महागडी सँडल होती. या सँडलला 'फॅशन डायमंड शू'ने मागे टाकलेले आहे.



आरोग्यवेध

## जगातील अत्याधुनिक मोतिबिंदू आणि लॅसिक तंत्रज्ञान

**चष्मा किंवा कॉंटॅक्ट लेन्स न लावता जग स्वच्छ दिसावे या तीव्र इच्छेतून अशा प्रकारच्या शस्त्रक्रियांवर अव्याहतपणे संशोधन सुरू आहे. या शस्त्रक्रिया अधिकाधिक अचूक आणि वेदनारहित व्हाव्यात यासाठी जगभरातील नेत्रतज्ज्ञ अथक प्रयत्न करत आहेत. आजवर (खरं तर अजूनही) लॅसिक लेसर ही शस्त्रक्रिया डोळ्याचा नंबर घालवण्यासाठीची लोकप्रिय शस्त्रक्रिया मानली जाते.**

**अ) लॅसिक शस्त्रक्रियेमधील प्रगती**

* स्माईल लेसरद्वारे चष्मा काढणे : स्माईल लेसर (ब्लेडलेस आणि फ्लॅपलेस लेसिक) ही चष्मा काढण्यासाठीची सर्वात सुरक्षित आणि कमी आक्रमक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत फ्लॅप कटिंगची गरज नसते, त्यामुळे कोरडेपणा कमी होतो आणि दीर्घकालीन परिणाम अधिक स्थिर राहतात. हे विशेषतः गोलाकार (स्फेरिकल) नंबर असलेल्या रुग्णांसाठी उत्तम पर्याय आहे.

* **कॉन्टुरा लॅसिक :** कॉन्टुरा हे प्रगत, वैयक्तिकृत लॅसिक तंत्र असून ते कॉर्नियाच्या आकाराच्या नकाशावर आधारित लेसर पॅटर्न वापरते. हे पारंपरिक लेसिकपेक्षा अधिक अचूक दृष्टी देते. हे ॲस्टिग्मॅटिझम (सिलिंड्रिकल पावडर) आणि हायपरोपिया (प्लस पॉवर्स) असलेल्या रुग्णांसाठी सर्वात योग्य आहे.

**वाचनाचे चष्मे काढणे :** ४० वर्षांनंतरही ब्लेंडेड व्हिजन लेसर आणि रिफ्रॅक्टिव्ह लेन्स एक्स्चेंज प्रक्रियेद्वारे वाचनाचा नंबर सहजपणे आणि वेदनारहित पद्धतीने केवळ ५ मिनिटांत दुरुस्त करता येतो.



* **आयसीएल इम्प्लांट:** नव्या पिढीतील आयसीएल तंत्रज्ञानाद्वारे-८ डायॉप्टरपेक्षा जास्त मायोपिया (दूरचा नंबर) सुधारता येतो. यात डोळ्यांचा कोरडेपणा होत नाही, रिग्रेशनची शक्यता कमी असते आणि ही प्रक्रिया गरज पडल्यास उलटवता (रिव्हर्सिबल) येते.

ब) कॅटरॅक्ट (मोतीबिंदू) शस्त्रक्रियेमधील प्रगती

**रिफ्रॅक्टिव्ह कॅटरॅक्ट सर्जरी :** ही शस्त्रक्रिया केवळ मोतीबिंदू दूर करत नाही, तर जवळ आणि लांबच्या चष्म्यावरील अवलंबित्व जवळजवळ संपवते. यात कटिंगच्या ठिकाणाचे वैयक्तिक नियोजन, योग्य लेन्सची निवड (ईडीओएफ किंवा ट्रॉफिकल) आणि इमेज-गाइडेड मोतिबिंदू सर्जरीचा समावेश असतो. योग्य रुग्णांची निवड काळजीपूर्वक केली जाते.

**रोबोटिक फेम्टोसेकंद मोतिबिंदू सर्जरी (फ्लॅसेस) :** या प्रक्रियेत शस्त्रक्रियेतील सर्वात महत्त्वाचे टप्पे रोबोटिक प्रिसिजन फेम्टोसेकंद लेसर तंत्रज्ञानाद्वारे पूर्ण होतात. त्यामुळे शस्त्रक्रिया अधिक सुरक्षित, अचूक आणि स्थिर परिणाम देणारी ठरते.

**कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित इमेज-गाइडेड प्रणाली :** एआय (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) आधारित इमेज गाइडेड प्रणालींमुळे नेत्रतज्ज्ञांना अधिक अचूक आणि सुरक्षित परिणाम मिळविण्यात मदत झाली आहे.

**- डॉ. वर्धमान कांकरिया,**
ज्येष्ठ नेत्ररोग तज्ज्ञ, एशियन आय हॉस्पिटल
फोन : ८८८८९४२२२२

## शब्दगंध साहित्य पुरस्कार, पुस्तकं पाठवण्याचे आवाहन

नगर – शब्दगंध साहित्यिक परिषद, महाराष्ट्र राज्य च्या वतीने राज्यस्तरीय वाङ:मय स्पर्धा आयोजित करण्यात आली असून ३१ डिसेंबर पर्यंत साहित्यिकांनी आपल्या साहित्यकृती पाठवाव्यात, उत्कृष्ट साहित्यकृतीना शब्दगंध साहित्य पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती शब्दगंधचे संस्थापक, सचिव सुनील गोसावी व अध्यक्ष राजेंद्र उदागे यांनी दिली.

यावर्षी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२५ दरम्यान प्रकाशित झालेले कथासंग्रह, काव्यसंग्रह, लेखसंग्रह, कादंबरी, आत्मचरित्र, संशोधन ग्रंथ, ललितसंग्रह, बालवाङ:मय इ प्रकारातील पुस्तकांच्या तीन प्रती, परिचय, ५ रु. पोस्टाची ५ तिकिटे यासह शब्दगंध साहित्यिक परिषद, फुलोरा, लक्ष्मी कॉलनी, भिस्तबाग महालाजवळ, तपोवन रोड, सावेडी, अहिल्यानगर ४१४००३. मो.क्र.९९२१००९७५० येथे पाठवाव्यात, परिक्षण झाल्या नंतर सतराव्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनात लेखक, कवींना शब्दगंध साहित्य पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. सन्मानपत्र. सन्मान चिन्ह, शाल असे पुरस्काराचे स्वरूप राहणार आहे. नवोदितांनी शब्दगंध साहित्य पुरस्कारासाठी आपली पुस्तके पाठवावेत, असे आवाहन कार्यवाह भारत गाडेकर, खजिनदार भगवान राऊत, राज्य संघटक प्रा.डॉ. अशोक कानडे, मिडिया समन्वयक मकरंद घोडके यांनी केले आहे.

# केडगाव उपनगरातील पाणीपुरवठा विस्कळीत, तातडीने सुरळीत करा अन्यथा 'तीव्र आंदोलन'

### माजी सभापती मनोज कोतकर यांचे आयुक्तांना निवेदन

नगर – शहरातील सर्वात मोठ्या उपनगरांपैकी एक असलेल्या केडगाव परिसरामध्ये गेल्या काही महिन्यांपासून पाणीपुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला असून नागरिकांना अत्यंत तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. उपनगरातील नागरिकांना दर ७ ते ८ दिवसांनी पाणीपुरवठा केला जातो, तोही अत्यंत कमी दाबाने होत असल्याने दैनंदिन घरगुती कामकाजावर मोठ्या प्रमाणात परिणाम होत आहे. या गंभीर स्थितीबाबत महानगरपालिका प्रशासनाला जाणीव करून देण्यासाठी मनपा स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर यांनी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन सादर करून ८ दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास मनपा मुख्यालयात तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, केडगाव उपनगराची लोकसंख्या वेगाने वाढत असताना त्या प्रमाणात पाणीपुरवठा वाढविण्याची आवश्यकता होती. मात्र प्रत्यक्षात परिस्थिती उलट असून पाणीपुरवठा दिवसेंदिवस कमी होत आहे. नागरिकांना पिण्याचा पाणीसुद्धा व्यवस्थित मिळत नसल्यामुळे महिलावर्ग, कामगार, ज्येष्ठ नागरिक या सर्वांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक कुटुंबांना खाजगी टँकरच्या माध्यमातून महागडे पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे.


केडगाव उपनगरातील विस्कळीत पाणीपुरवठा तातडीने सुरळीत करा, या मागणीचे निवेन आयुक्तांना देताना मनोज कोतकर.

मनोज कोतकर यांनी सांगितले की, गेल्या ४ ते ५ महिन्यांपासून कमी दाबाने आणि अनियमित पाणीपुरवठ्याबाबत महानगरपालिकेला सतत पत्रव्यवहार, फोनद्वारे संपर्क तसेच प्रत्यक्ष भेटीद्वारे तक्रारी नोंदवल्या आहेत. परंतु अद्यापपर्यंत कोणतीही ठोस उपाययोजना न केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. पाण्यासारख्या मूलभूत गरजेच्या बाबतीत महानगरपालिकेचा कारभार पूर्णतः नियोजनशून्य आहे. महानगरपालिकेने पाणीपट्टीमध्ये वाढ केली असतानाही नागरिकांना नियमित आणि योग्य दाबाने पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी पूर्ण करण्यात मनपा अपयशी ठरत असल्याचे मनोज कोतकर यांनी निवेदनात नमूद केले आहे.

केडगाव परिसरात पाण्याच्या तुटवड्यामुळे स्वच्छता, आरोग्य आणि दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम होत असून स्थिती दिवसेंदिवस बिकट होत आहे. येत्या ७ ते ८ दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत करून पूर्ण दाबाने देण्यात आला नाही तर कोणतीही पूर्वसूचना न देता संतप्त नागरिकांच्या समवेत महानगरपालिका मुख्यालयात तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल आणि त्यामुळे उद्भवणाऱ्या परिणामांची सर्वस्वी जबाबदारी महानगरपालिकेवर राहील, असा इशारा मनोज कोतकर यांनी निवेदनाद्वारे दिला.



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने मनपा, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी अहिल्यानगरमध्ये मुलाखती पार पडल्या. यावेळी इच्छुकांनी गर्दी केली होती.

# ठाकरे शिवसेनेच्या मुलाखतींना इच्छुकांचा प्रतिसाद

### उमेदवारीसाठी रस्सीखेच, इच्छुकांचे शक्तिप्रदर्शन

नगर – आगामी महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकांकरिता शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या इच्छुकांच्या मुलाखती गुरुवारी पार पडल्या. यावेळी इच्छुकांनी शक्ती प्रदर्शन करत प्रतिसाद दिला. या निमित्ताने पक्षात आपल्यालाच उमेदवारी मिळावी यासाठी इच्छुकांमध्ये रस्सीखेच पाहायला मिळाली. इच्छुकांचा अहवाल वरिष्ठांना सादर करणार असून शिवसेना निवडणुकांना अत्यंत ताकतीने सामोरी जाणार असल्याचे, जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी, महानगर प्रमुख किरण काळे यांनी म्हटले आहे.

मुलाखतींना यावेळी इच्छुकांनी आपल्या समर्थकांसह गर्दी केली होती. आपल्याच इच्छुकाला पक्षाने उमेदवारी द्यावी यासाठी नेत्यां समोर समर्थक बाजू मांडत होते. मागील पाच वर्षात केलेल्या राजकीय, सामाजिक कार्याचा अहवाल सादर करत होते.

शिवसेना कार्यालयाने माहिती देताना सांगितले आहे की, मनपासाठी २१७, जिल्हा परिषद साठी ९८, पंचायत समितीसाठी १४१ इच्छुकांनी उमेदवारीसाठी अर्ज केला आहे. या सर्व अर्जांची छाननी केली जाईल. पक्ष संघटनेसाठी केलेले काम आणि निवडून येण्याची क्षमता या आधारे चाचपणी केली जाईल. वरिष्ठांना अहवाल सादर करून पुढील आदेशाप्रमाणे निवडणुकीची तयारी केली जाईल.

#### मविआसाठी चर्चा सुरू, वेळप्रसंगी स्वबळाची देखील तयारी

किरण काळे म्हणाले, मनपा निवडणुकीसाठी काँग्रेस, राष्ट्रवादीला महाविकास आघाडी करण्याचा प्रस्ताव आम्ही यापूर्वीच दिला आहे. त्याची एक बैठक देखील पार पडली आहे. मविआचे खा. निलेश लंके यांच्याशी प्राथमिक चर्चा झाली आहे. आम्ही आघाडीसाठी सकारात्मक आहोत. मनसेशी देखील प्राथमिक चर्चा झाली आहे. मुंबईत शिवसेना, मनसेची युती होत आहे. अहिल्यानगर मध्ये देखील त्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. शहरात शिवसेना आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गवई गट अशी शिवशक्ती, भीमशक्ती आघाडी यापूर्वीच झाली आहे. अन्य काही समविचारी पक्षांशी देखील आम्ही संपर्कात आहोत. यातून अंतिमत: काय ठरते हे पाहावे लागेल. मात्र आम्ही स्वबळाची देखील पूर्ण तयारी केली आहे, असे काळे यांनी सांगितले.

#### जि.प., पं. स.साठी सज्ज

राजेंद्र दळवी म्हणाले, जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी अपेक्षेपेक्षा चांगला प्रतिसाद इच्छुकांनी दिला आहे. प्रत्येक तालुक्यातील परिस्थिती वेगळी आहे. ज्या ठिकाणी शिवसेना सक्षम आहे त्या ठिकाणी जास्तीत जास्त जागा लढण्यासाठी आमचा आग्रह राहणार आहे. मतांचे विभाजन टाळण्यासाठी मविआ आघाडीतील घटक पक्षांना बरोबर घेऊन निवडणूक लढवावी या मताचे आम्ही आहोत. त्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. त्या, त्या तालुक्यातील स्थानिक पदाधिकारी, शिवसैनिकांना विश्वासात घेऊन रणनीती ठरविली जाईल. मात्र, वेळप्रसंगी स्वबळावर देखील लढण्याची तयारी आम्ही केली आहे. कोणत्याही परिस्थितीत शेतकरी, कष्टकरी, युवक, महिला यासह सर्व घटकांना न्याय देण्यासाठी आम्हाला जि. प., पं. समितीमध्ये शिवसेनेच्या विचारांची सत्ता आणायची असल्याचे दळवी म्हणाले.

## केडगाव उपनगरातील एकनाथनगरच्या राधाकृष्ण कॉलनीत 'रस्त्यांची दुरावस्था'

### ड्रेनेज लाईन आणि पाणी प्रश्न गंभीर, नागरी समस्येने नागरिक हैराण; जागरूक मंचच्या वतीने आयुक्तांना निवेदन

नगर – केडगाव एकनाथनगर परिसरातील राधाकृष्ण कॉलनी येथील रस्त्यांची दुरावस्था, ब्लॉक ड्रेनेज लाईन आणि अत्यल्प दाबाचा पाणीपुरवठा या समस्यांनी स्थानिक नागरिक अक्षरशः हैराण झाले असून, या प्रश्नांची तातडीने दखल घेण्यासाठी केडगाव जागरूक मंच यांच्या वतीने मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आले.


केडगाव एकनाथनगर परिसरातील राधाकृष्ण कॉलनी येथील रस्त्यांची दुरावस्था, ब्लॉक ड्रेनेज लाईन आणि अत्यल्प दाबाचा पाणीपुरवठा या समस्यांनी स्थानिक नागरिक अक्षरशः हैराण झाले असून, या प्रश्नांची तातडीने दखल घेण्यासाठी केडगाव जागरूक मंच यांच्या वतीने मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देण्यात आले.

मंचाचे अध्यक्ष विशाल पाचारणे यांनी मनपा आयुक्त डांगे यांची भेट घेऊन नागरिकांच्या वतीने प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली आहे. अर्चना हॉटेल ते कांदा मार्केट या मुख्य रस्त्याला लागून असलेल्या राधाकृष्ण कॉलनीतील अंतर्गत रस्ता अत्यंत खराब अवस्थेत असून धोकादायक बनला आहे. या रस्त्याने लहान मुले, महिला व वृद्ध व्यक्तींना चालणे अवघड झाले असून लहान-मोठे अपघात घडत असल्याचे मंचतर्फे सांगण्यात आले. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

पूर्वी टाकण्यात आलेली ड्रेनेज लाईन पूर्णतः ब्लॉक झाल्याने सांडपाण्याचा मुद्दा बिकट झाला आहे. दुर्गंधी, अस्वच्छता आणि पाणी साचण्याच्या समस्येमुळे आरोग्य धोक्यात येत असल्याचे नागरिकांनी निवेदनात नमूद केले आहे. ड्रेनेज लाईनची तात्काळ दुरुस्ती किंवा आवश्यक असल्यास नवीन लाईन टाकावी, अशी मागणी करण्यात आली. सदर भागात पाणीपुरवठा अत्यल्प दाबाने होत असून अनेकदा चार ते पाच दिवसांनीच पाणी मिळते, असा आरोप करण्यात आला आहे. परंतु अनेक तक्रारी करूनही उपाययोजना न झाल्याने लोकांमध्ये संताप वाढला आहे. रस्ते, ड्रेनेज व पाणीपुरवठा या तिन्ही समस्या गंभीर असल्याने प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन उपाययोजना करण्याचे म्हटले आहे. प्रशासनाकडून प्रतिसाद न मिळाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा केडगाव जागरूक मंचाने दिला आहे.

## नगर शहरात ६ डिसेंबर रोजी धर्मेंद्र यांच्या गीतांची महफील

नगर – गाता रहे मेरा दिल ग्रुपच्या वतीने अभिनेता धर्मेंद्र यांच्या गीतांची महफीलचे ६ डिसेंबर रोजी संध्याकाळी ७ वाजता सर्जेपुरा येथील रहमत सुलतान सभागृहात आयोजन करण्यात आले. धर्मेंद्र यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी ॲड.अमीन धाराणी यांच्या पुढाकाराने ही महफील आयोजित करण्यात आली आहे.



या महफीलीत सुनील भंडारी, डॉ. सुद्रिक, संजय भिंगारदिवे, अभय मोहिते, माधवी गुजर, नरेश पेवाल, अमिन धारानी, जीवन महाजन, मुख्तार शेख, चारू ससाणे, जगताप सर, राजू सावंत, राजेंद्र शहाणे, रज्जाक शेख हे गीत सादर करणार आहे. सुत्रसंचालन राजु सावंत करणार आहे. सिस्टीम व तांत्रिक सहाय व्यवस्था अमीन धाराणी यांचे असल्याचे आबीद खान यांनी सांगितले. सर्वांना मोफत प्रवेश असून कार्यक्रम वेळेवर सुरू होईल. रसिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा असे आवाहन ॲड. गुलशन धाराणी यांनी केले आहे.

# जिल्ह्यातील ११ पोलीस निरीक्षक पदोन्नती कक्षेत

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील ११ पोलीस निरीक्षक पदोन्नतीच्या टप्प्यात आले आहेत. या पैकी ९ पोलीस निरीक्षक सध्या पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी म्हणून कामकाज पहात आहेत. जिल्ह्यातील पदोन्नतीच्या कक्षेत एवढ्या मोठ्या प्रमाणावर पोलीस निरीक्षक येण्याची पहिलीच वेळ आहे.

राज्याच्या पोलिस महासंचालक कार्यालयाने पदोन्नतीच्या कक्षेत विचाराधीन असलेल्या ४४८ पोलीस निरीक्षकांची निवड सूची नुकतीच जाहीर केली आहे. या निवड सूचीनुसार अहिल्यानगर जिल्ह्यातील ११ पोलीस निरीक्षक पदोन्नतीच्या टप्प्यात आले आहेत. या मध्ये कंसात सध्या नियुक्तीचे ठिकाण धनंजय जाधव (जिल्हा विशेष शाखा), इशामोदीन पठाण (महिला व बाल अपराध शाखा), विलास पुजारी (पाथर्डी पोलीस ठाणे), जगदीश भांबळ (तोफखाना), नितीन चव्हाण (राहता), सोपान शिरसाठ (कर्जत), दशरथ चौधरी (जामखेड), संदीप कोळी (कोपरगाव), संजय सोनवणे (आश्वी), रामकृष्ण कुंभार (कोपरगाव पोलीस ठाणे) व नंदकुमार दुधाळ (वाचक पोलीस अधीक्षक कार्यालय) यांचा समावेश आहे.

या मधील सेवा जेष्ठता यादी मधील कोणत्या पोलीस निरीक्षकांची पदोन्नती होत आहे याची उत्सुकता जिल्ह्यातील पोलिसांना लागून राहिली आहे. तसेच पोलीस ठाणे प्रभारी असलेल्या विद्यमान पोलीस निरीक्षकांना पदोन्नती मिळाल्यानंतर रिकाम्या होणाऱ्या पोलीस ठाण्याकडे इतर कनिष्ठ पोलीस निरीक्षकांचे देखील डोळे लागलेले असतात.

निवृत्तीसाठी अधिक काळ शिल्लक असल्यास व पोलीस ठाणे पदी प्रभारी अधिकारी म्हणून नियुक्तीस असल्यास अनेकदा पोलीस उपअधीक्षक पदोन्नतीसाठी पोलीस निरीक्षक अनिच्छुक असतात. वरील नमूद पोलीस निरीक्षकांना पदोन्नती देण्यासाठी पोलीस महासंचालक कार्यालयाने या अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल तसेच विभागीय चौकशी, संक्षिप्त चौकशी, इतर चौकशी, न्यायालयीन प्रकरणे, शिक्षा इत्यादी बाबींची मागणी केलेली आहे.

वरील बाबीची पूर्तता झाल्यानंतरच पदोन्नतीसाठी पात्र ठरणार आहेत. पदोन्नतीची अंतिम घोषणा पुढील एक दोन महिन्यांमध्ये होण्याची दाट शक्यता आहे.

## गुलदस्ता ग्रुपतर्फे नगर शहरात ६ डिसेंबर रोजी 'कवी संमेलन'

नगर – अहिल्यानगर येथील गुलदस्ता ग्रुपच्या वतीने कवी व नवोदित कवींसाठी कवी संमेलनाचे आयोजन ६ डिसेंबर रोजी दुपारी ४ ते ६ या वेळेत गुलमोहर रोड वरील अशोकनगर, कलानगर चौकातील आधार आपुलकी फाउंडेशन, सावेडी अहिल्यानगर येथे कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.




गुलदस्ता ग्रुपच्या वतीने पहिल्या कवी संमेलनाचे आयोजन प्रथमच अहिल्यानगर शहरात होत आहे. या कार्यक्रमांतर्गत येथील कवींना हक्काचे व्यासपीठ मिळणार आहे. दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी कवी संमेलनाचे आयोजन केले जाणार असून कवींना या व्यासपीठाद्वारे आपली कला सादर करण्याची संधी मिळणार आहे. कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळाले पाहिजे हा मूळ उद्देश असल्याचे ग्रुपचे संयोजक रवी डीक्रूज, निखिल कुलकर्णी, रिजवान शेख यांनी सांगितले आहे. प्रवेश विनामूल्य असून संपर्कासाठी मोबाईल ७०२००२५४१७.


मराठा आंत्रप्रेन्यूअर असोसिएशन शाखा सुरू करण्याबाबत असोसिएशनच्या नगर जिल्ह्याच्या शाखेच्या संदर्भात त्यांनी नगरला चैतन्य पब्लिसिटी व ट्रॅव्हल्स या फर्मला भेट दिली.

## मराठा आंत्रप्रेन्यूअर असोसिएशनची लवकरच नगरला शाखा

नगर – पुणे येथील मराठा समाजातील उद्योजक व व्यावसायिकांनी दहा वर्षांपूर्वी मराठा आंत्रप्रेन्यूअर असोसिएशन सुरू केलेल्या (MEA) या संघटनेची नगर येथे लवकरच शाखा सुरू होणार असल्याची माहिती या असोसिएशनचे पदाधिकारी राकेश गोड पाटील व संदेश मगर यांनी दिली.

या असोसिएशनच्या नगर जिल्ह्याच्या शाखेच्या संदर्भात त्यांनी नगर जिल्ह्यातील विविध तालुक्यात जाऊन अनेक उद्योजक, महत्त्वाच्या व्यक्ती यांच्या गाठीभेटी घेतल्या ते नगरला चैतन्य पब्लिसिटी व ट्रॅव्हल्स या फर्मला भेट दिली. त्यावेळी त्यांनी असोसिएशनच्या कार्याची माहिती दिली.

ते पुढे म्हणाले की या असोसिएशनच्या माध्यमातून मराठा समाजातील उद्योजकांना एकत्र आणणे त्यांना व्यावसायिक मदतीचा हात देणे तसेच समाजातील तरुणांना आपल्याच समाजातील उद्योजकांच्या मदतीने नोकरी देणे. नवीन येणाऱ्या व्यावसायिकांना सर्व प्रकारचे सहकार्य करणे या साठी पुण्यातील अनेक नामवंत उद्योजकांनी एकत्र येऊन या संस्थेची उभारणी केली आहे या माध्यमातून आजपर्यंत अनेक कार्यक्रम राबवले गेले आहेत आज पुरुष आणि महिला मिळून ९०० सभासद या असोसिएशनच्या असून आता जिल्हास्तरीय शाखा सुरू करण्याचा मानस असून या माध्यमातून सर्वांना एकत्र करून व्यावसायिक वाढ व्हावी हा प्रयत्न आहे.

यामध्ये उद्योजक व विविध क्षेत्रातील व्यावसायिक, चार्टर्ड अकाउंटंट, डॉक्टर्स, फायनान्सर आदींचा समावेश असून दरवर्षी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते आता प्रत्येक जिल्ह्यात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून याद्वारे व्यावसायिक मार्गदर्शन, समाजातील नामवंत उद्योजकांचे मार्गदर्शन, एक्झिबिशन, स्टडी टूर, अशा विविध उपक्रमाचे आयोजन केले जात आहे.

या पदाधिकाऱ्यांनी नगर येथील काही समाज प्रेमी, संघटन प्रेमी व व्यावसायिकांची भेट घेतली व त्यांच्याशी चर्चा केली यामध्ये मराठा पतसंस्थेचे संस्थापक संचालक किशोर मरकड, हॉटेल उद्योजक व वक्ते नवनाथ धुमाळ, उद्योजक गोरक्षनाथ दांगट, दौलत शिंदे, राहुल मोटे, आदींची भेट घेतली. लवकरच नगरे ते प्राथमिक स्वरूपात बैठक आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी किशोर मरकड यांनी या पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला.

## श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती शासकीय कार्यालयात साजरी करण्यात यावी

### जिल्हा तैलिक महासभेची मागणी

नगर – महाराष्ट्र शासनाने डिसेंबर २०१८ साली काढलेल्या परिपत्रकानुसार राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती यांच्या जयंती व राष्ट्रीय दिन साजरे करणे. या कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, (शासन परिपत्रक क्र.ज.पु.ति. २२१८/प्र.क्र.१९५/२९ दि.२६/१२/२०१८) संदर्भानुसार श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती ८ डिसेंबर रोजी साजरी करण्याचा आदेश काढण्यात आला आहे. त्याचे पालन व्हावे. त्यानुसार ८ डिसेंबर सोमवारी नगर जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयात श्री संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्यात यावी. असे आवाहन महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे नाशिक विभागीय कार्याध्यक्ष हरिभाऊ डोळसे यांनी केले आहे.



शासनाच्या व निमशासकीय कार्यालय तसेच शैक्षणिक संस्था श्री संत संतांजी महाराजांची जयंती साजरी करण्यासाठी आधिकृत फोटोंचा वापर करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

फोटो फ्रेम मिळण्यासाठी श्री संताजी फ्रेम वर्क, परसराम सैंदर, शिंपीगल्ली, तेलीखुंट, नगर श्री दत्त फ्रेमिंग वर्क्स, बाळासाहेब देशपांडे दवाखान्यासमोर, नगर ओंकार सुपर स्टोअर्स, महाजनगल्ली, नगर किंवा अधिक माहितीसाठी हरिभाऊ डोळसे (मो. ९८२२२७१८०७) यांच्याशी संपर्क साधावा.


स्त्यावर अतिक्रमण करून वाहतुकीला अडथळे निर्माण करणाऱ्यांवर पोलिसांनी मुंबई पोलीस अधिनियम कलम ९९, ११७ च्या अन्वये कारवाई सुरु केली आहे. अहिल्यानगर शहरामध्ये सर्व ठिकाणी कारवाया सुरू आहेत. कापड बाजार येथील रस्त्यावर अडथळे करणाऱ्यांवर कारवाई करताना पोलीस कर्मचारी. (छाया – धनेश कटारिया)

## किशोर रायमोकर यांचे उपोषण तूर्त स्थगित

नगर – वारस नोंदीची प्रक्रिया पूर्ण करण्यास महसूल विभागाकडून होत असलेल्या दिरंगाईच्या निषेधार्थ शहरातील माळीवाडा, गोंधळे गल्ली येथील किशोर मधुकर रायमोकर व इतरांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरु केलेले उपोषण स्थगित केले आहे. सध्या जिल्ह्यात निवडणुकीची आचारसंहिता सुरु असल्याने कुळ कायदा विभागाचे तहसीलदार शिंदे यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर हे उपोषण स्थगित करत असल्याचे रायमोकर यांनी सांगितले आहे. २१ डिसेंबरला आचारसंहिता संपल्यावर आंदोलनाबाबत निर्णय घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## नगरपालिका, नगरपंचायतींची मतमोजणी २१ डिसेंबरलाच

### उच्च न्यायालयाचा निकाल सर्वोच्च न्यायालयातही कायम

नवी दिल्ली – राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचायतीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान झाले. मात्र ही मतदान प्रक्रिया राबवली जात असताना अंतिम दोन दिवसांमध्ये राज्यातील काही नगरपालिकांचे मतदान लांबणीवर टाकत ते २० डिसेंबर रोजी तसेच त्यांची मतमोजणी २१ डिसेंबर रोजी होणार असल्याचा निर्णय घेतला गेला. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. ५ डिसेंबरला या प्रकरणाची सुनावणी झाली असता सर्वोच्च न्यायालयाने मतमोजणी २१ डिसेंबराच होणार असल्याचे सांगितले आहे.

सरन्यायाधीश सूर्य कांत व न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर मतमोजमीच्या विषयासंदर्भात सुनावणी पार पाडली. यावेळी खंडपीठाने निवडणुकांचा जो कालावधी निश्चित केला आहे. त्याच्या आत म्हणजेच ३१ जानेवारीपूर्वी निवडणूक प्रक्रिया पूर्ण करावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. कोणत्याही कारणास्तव निवडणुका पुढे ढकलण्याचा प्रयत्न होऊ नये, असेही खंडपीठाने सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाने सर्व पक्षकारांची बाजू ऐकून घेतल्यानंतर आपला निकाल दिला. २० डिसेंबर रोजी होणाऱ्या निवडणुका काही कारणास्तव जर पुढे ढकलल्या गेल्या तर पुन्हा निवडणुकीची प्रक्रिया पुढे ढकलली जाऊ शकते. मात्र तरीही २१ डिसेंबर रोजी २ डिसेंबरला झालेल्या निवडणुकांचा निकाल जाहीर केला जावा. तसेच उच्च न्यायालयात ज्या याचिका प्रलंबित आहेत, त्यांचा कुठलाही व्यत्यय निवडणूक कार्यक्रमात येता कामा नये, असेही सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सांगितले.

